# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह**

**विशेष महासभा दि. ३१/०३/२०१०**

आज बुधवार दि. ३१/०३/२०१० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०९ दि. १८/०३/२०१० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | उपमहापौर |
| ३) | नलावडे दिनेश दगडू | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील जयंत महादेव | सभागृह नेता |
| ५) | जंगम लक्ष्मण गणपत | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ८) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ९) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १४) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १५) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १६) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| १९) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| २०) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २१) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| २२) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २३) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २४) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २५) | शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| २६) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २७) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २८) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| २९) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| ३०) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ३१) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ३२) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| ३३) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ३४) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| ३५) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३६) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३७) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३८) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३९) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ४०) | पाटील प्रफुल्ल काशीनाथ | सदस्य |
| ४१) | वर्षा भानुशाली | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| ४३) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४४) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| ४५) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ४६) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ४७) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४८) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४९) | सय्यद नुरजहाँ नझर हुसैन | सदस्या |
| ५०) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ५१) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ५२) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ५३) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ५४) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ५५) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५६) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५७) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५८) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५९) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ६०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६१) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६२) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ६३) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| ६४) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| ६५) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| ६६) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ६७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६८) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६९) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ७०) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |
| ७२) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |
| ७३) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| २) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ३) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| ४) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ५) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| ६) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| ७) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ८) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| १०) | परशुराम दा. पाटील | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने बोलतो की, या सुचनेव्दारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा बुधवार दि. ३१/०३/२०१० रोजी सकाळी ११.०० वा. मिरा भाईंदर महापालिका स्वर्गीय इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय तिसरा मजला छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात मा. महासभा सुचना क्र. ९ दि. १८/०३/२०१० रोजीच्या सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रथम आजच्या स्थायी समिती सभा होती स्थायी

समिती सभापती श्री. दिनेश नलावडे हे २००९-२०१० चे सुधारित आणि २०१०-२०११ चे मुळ अंदाजित पत्रक मा. महापौरांना सादर करतील. मी स्थायी समिती सभापती यांना मी विनंती करतो की त्यांनी डायसवर मा. महापौरांना बजेट सादर करायचे आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब एक थोडेसे आम्हांला निवेदन हवे होते. सभागृहाला एक दोन तीन दिवस संपूर्ण शहरामध्ये चर्चा चालू होती. मा. आयुक्त साहेबांकडून निवेदन हवे होते की अशा कोणत्या प्रकारचा गुन्हा आयुक्तांनवरती दाखल झालेला आहे का? कारण वर्तमान पत्रातून आम्ही वाचतोय सर्वत्र चर्चा चालु आहे कृपया मा. आयुक्तांनी यावर सभागृहात निवेदन द्यावे.

**जयंत पाटील :-**

अर्थ संकल्पावरतीच चर्चा व्यतिरिक्त विषय घ्यायचा नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब सभागृहाला कळले पाहिजे ना नक्की काय प्रकार आहे तो.

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समिती सभापती मा. महापौरांना बजेट सादर करीत आहेत.

**मा. महापौर :-**

आज बजेट शिवाय कुठलीही चर्चा करता येणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब विषयावर चर्चा नको आहे आम्हाला, निवेदन द्यावे मा. आयुक्त साहेबांचे

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये ऐवढी बदनामी झालेली आहे. आणि आपल्याला बजेट दिसतोय आपल्याकडे या शहरामध्ये मा. ्आयुक्तांच्या गुन्ह्याची नोंद घेतली पाहिजे. मा. महापौर साहेब या शहराच्या......

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समिती सभापती यांनी बजेट सादर केलेले आहे. मा. महापौर साहेब बजेट उघडून सदस्यांना दाखवत आहेत.

**नगरसचिव :-**

मा. स्थायी समिती सभापती आपले निवेदन सभागृहात सादर करतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब आपल्या शहरामध्ये ज्या बातम्या आलेल्या आहेत. कमिशनर साहेबांच्या बाबतीत खरोखरचं ही बाब किती सत्य आहे या सभागृहाचा किती मान आहे. या शहरामध्ये बदनामी झालेली आहे या सभागृहात खुलासा मला पाहिजे.

**(गोंधळ सभागृहात )**

**दिनेश नलावडे :-**

सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर साहेब सन्मानिय सभागृहातील विरोधी पक्षनेते.

**मा. महापौर :-**

आज चर्चेचा विषय नाही आहे. आज आपण जरा खाली बसून घ्या. आज प्लीझ आज बजेटचा विषय आहे. दुसरा कुठला विषय घेऊ नये. आपण सदस्यांनी खाली बसून घ्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. आयुक्ताने सन २००९-१० सुधारित सन २०१०-११ चा अंदाजपत्रक आणि परिवहन उपक्रमाचे (ब), वृक्षप्राधिकरण समितीचे अंदाजपत्रक, मा. स्थायी समिती सभा दि. ११/३/२०१० रोजी सभेस सादर. सर्व मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी सदर अंदाजपत्रकावर सतत चार दिवस प्रकाशित जमा व खर्चाच्या अंदाजावर काही सूचना केल्या. महापालिकेच्या जे.एन.एन.यु.आर.एम. मधील मंजूर योजना व एम.एम.आर.डी.ए. कडील मंजूर कलमाच्या अटी शर्ती पाहता मनपाने पाणी लाभ कर, रस्ता कर, मलनिःसारण कर, नवीन कर व पाणी दरात व मालमत्ता करात अल्पशी वाढ सुचविली आहे. नागरिकांवर कमीत कमी कराचा बोजा पडेल या दृष्टीने लक्ष ठेवून मा. स्थायी समितीने कर वाढीच्या प्रस्तावावर मंजूरी देऊन याद्वारे उपलब्ध हेणारा निधी, भूयारी गटार योजना, नवीन पाणीपुरवठा योजना, बीील स्विकृत योजना यावर मनपा हिस्सा म्हणून दाखविण्यात आलेला आहे. महानगरपालिकेचे ‘अ’+‘क’ महिला बालकल्याण अंध व अपंग जे.एन.एन.यु.आर.एम. पी बजेट याद्वारे मिळणारा आर्थिक शुल्क जमा महसुल रक्कम रू. ५८३.५५ लक्ष इतका आहे व अपेक्षित खर्च रू. ५७२.५५ लक्ष इतका विचारात घेता रू. ११ लक्ष शिलकी अंदाजपत्रक आपल्याकडे सादर करीत आहे. मिरा भाईंदर मधील सर्व नागरिकांना उत्तम दर्जाच्या मुलभूत सुविधा पुरविण्याची बांधिलकी लक्षात घेऊन संपूर्ण महापालिका क्षेत्रात विकासाची कामे गनिमानाने करणे सुरू आहे. त्यासाठी मनपाचे महसूली उत्पन्न कमी पडत असल्याने या अंदाजपत्रकात योजनावरील खर्चासाठी कराची उभारणी करण्यात आलेली आहे. जेणेकरून मंजूर योजना मुदतीत पूर्ण होऊन नागरिकांना त्याचा लवकरात लवकर उपभोग घेता यावा, तसेच नागरिक गरिब,

दुर्बल घटक, महिला बालकल्याण, अंध-अपंग यासाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. नगरसेवक स्वेच्छा निधी अंतर्गत प्रत्येक नगरसेवक रू. १० लक्ष याप्रमाणे एकूण ८.४० कोटी रू. इतकी तरतूद या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. शासन परिपत्रक क्र.एएमसी-१४२००/२२६४/प्र.क्र.१४४/नवि-२६, दि. २६/२/२००१ नुसार सन्मा. नगरसेवकांना कामे सुचविता येतील. प्रभाग समितीचा देखील यासाठी विचार करण्यात आला असून प्रभाग समिती अंतर्गत ८ कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. सभेचे अंदाजपत्रक तयार करताना भावी काळात शहराचा होणारा विकास, वाढणारी लोकसंख्या, महापालिकेचे उत्पन्न या सर्व बाबी लक्षात घेऊन प्राप्त उत्पन्नातून शहरातील सर्व घटकांना दिलासा देण्याचे ध्येय जवळ ठेवले आहे. अर्थसंकल्प तयार करताना मा. स्थायी समितीच्या सदस्यांनी लोकोपयोगी कामाबद्दल जागरुकता ठेवून चांगल्या चांगल्या नागरी सुविधा पुरविणे बाबत मोलाच्या सुचना केलेल्या आहेत. मा. आयुक्त , मा. उपायुक्त, अधिकारी, कर्मचारी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले म्हणून त्या सर्वांचे मी आभार मानतो. मा. महापौर महोदय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये मा. स्थायी समितीने विचार विनिमय करून तयार केलेला सन २००९ – २०१० सुधारित सन २०१०-२०११ चा अर्थ संकल्प महापालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये मंजूरीसाठी आपल्यकडे सादर करण्यात येत आहे. धन्यवाद, सहकार्या बद्दल आभार. जय हिंद, जय महाराष्ट्र.

**नगरसचिव :-**

पिठासीन अधिका-यांच्या परवानगीने आज आपल्याकडे सहा. नगररचनाकार श्री. धनगावे हे हजर झालेले आाहेत. माहितीसाठी मी सगळ्यांना जाहिर करतो.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेबांना निवेदन द्यायला सांगा ना. पाच मिनिटे निवेदन होऊ द्या. सभागृहाला अवगत होऊ द्या की काय प्रकार आहे?

**(सभागृहात गोंधळ )**

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्यांनी आजच्या सभेत बजेटचे विषय असल्याने सभागृहात चर्चा करणे योग्य नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अशी कशी चर्चा करता येत नाही. फक्त पाच मिनिटात निवेदन होऊ द्या.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश गारोडिया एखादी बाब न्याय प्रविष्ट असेल तर सभागृहात बोलता येत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग न्याय प्रविष्ठ असताना पत्रकार परिषद कशी काय घेतली?

**प्रशांत पालांडे :-**

दादा मग तुम्हाला हे सगळं माहिती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मग पत्रकार परिषद कशी घेतली.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्हांला सगळं माहिती आहे आम्हाला जेवढं माहिती नाही ते आम्हाला कळू द्या.

**मा. महापौर साहेब :-**

आपण सगळ्यांनी बसून घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ६४ मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ ''अ'' + ''क'' + ''अंध व अपंग'' + ''महिला बालकल्याण'' + ''JNNURM'' + ''P'' अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४८, ठराव क्र. ११८)

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब त्या विषयाला धरून तीन विषय आहे. ६४-६५ आणि ६६ एखाद्या ''अ'' अंदाजपत्रक आपण पहिला घेतला तर या दोनची आवश्यकता आपल्याला भासणार नाही. खरंतर या अंदाजपत्रकमध्ये यांचा समाविष्ट आहे. तर आपण किती दरवाढ करायची आहे. ६५ मध्ये जर आपण परिवहनाचा विषय आहे. जर एखाद्या त्यांना अनुदान द्यायचे असेल तर ''अ'' कसा मंजूर होईल. पहिला खालचे दोन मंजूर झाले तर वरचा ''अ'' कसा मंजूर होईल. नाही तर एखादा वरचा मंजूर केला तर गरजंचं नाही खालचा मंजूर करायची. तर माझे म्हणणे काय क्रम बदलून घेण्यात यावे.

**शरद पाटील :-**

क्रम बदलून घेण्यापेक्षा तुम्हाला एवढ माहिती होतं ना पण याची माहिती नव्हती का? अधिकारी कशासाठी आहेत. सगळे विधी सल्लागार आहेत. सगळे इथे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब तो स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर झालेला आहे. तो सर्वांनुमताने झाला आहे की बहुमताने झालेला आहे.

**नगरसचिव :-**

सचिव कार्यालयाकडून ठरावाची प्रत दिलेली आहे.

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब, जो स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर झाला होता तो सर्वांनुमते होता की बहुमताने होता.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे साईन केलेला जो ठराव आलेला आहे तो सर्वांनुमते असा आहे.

**प्रविण पाटील :-**

नाही, नाही तिथे बहुमताने असेल आमचा त्याला विरोध होता.

**मदन उदितनारायण सिंह :-**

सचिव साहेब, सभागृहात १६ सदस्यांनी सही केलेली होती का? तुम्ही म्हणता साईनमध्ये सर्वांनुमते होता तर १६ सदस्यांची सही होती का? सचिव साहेब त्या ठरावाला माझा स्पष्ट विरोध होता तर तो ठराव बहुमताने आहे सर्वांनुमते नाही तर ती दुरूस्ती करून घ्यावी.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, स्थायी समितीमध्ये जो ठराव झाला सचिव साहेब मी तुम्हाला विचारतो त्याच्यावर मतदान झालेले होते का?

**नगरसचिव :-**

मतदान नाही झालेले होते.

**अनिल सावंत :-**

सर्वांनुमते झाला होता म्हणजे चला....

**(सभागृहात गोंधळ )**

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब आपण जर क्रम बदली केला तर व्यवस्थित काम होईल. पहिले आपण 'अ' ला मंजूरी दिली नंतर 'ब' मंजूर केल्यास महत्व राहणार नाही.

**मा. आयुक्त सो. :-**

९/१० आणि १०/११ चं घ्यावा लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब असं विषय घेऊन काय होणार आहे. साहेब उलट होणार आहे हे 'अ' ला मंजूर आल्यानतर परिवहनमध्ये कमी रस्ते केल्यानंतर मग रस्ते राहिलेच कुठे? "अ" मंजूर झाला म्हणजे ॲटोमेटिकली मंजूर झाला. मग परत त्या मूल मुल्यावर सुध्दा सुधारणा करायला हवी. मग ते डबल काम होईल ना? मा. महापौर साहेब क्रम बदली झाला पाहिजे एखादा "अ" अंदाजपत्रकात आपण परिवहनाला अनुदान द्यायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, मेहता साहेब दोन वर्ष महापौर होते त्यांनी त्यावेळी कसं काय बजेट पास केले.

**प्रशांत पालांडे :-**

मगं त्यावेळी झालेली चुक परत करायची काय सुधारा ना ती चुक?

**मा. महापौर सो. :-**

जो क्रम जसा आहे तो क्रम तसा राहू द्या.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब. पुढचा माझा विषय हा असा आहे की जो "अ" अंदाजपत्रक सादर केलेले आता मा. स्थायी समिती सभापती यांनी निवेदन सादर केलेले आहे तर या अंदाजपत्रकात दरवाढ केलेली आहे. तर मग त्या समाविष्ट करू नये की, वगळावे की काय?

**मा. आयुक्त सो. :-**

मा. महापौर सो., दरवाढ जी केलेली आहे. तर ती दरवाढ सामाविष्ट करूनच अंदाजपत्रक केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब आपण दरवाढ बघा. त्यांच्यामध्ये अर्जामध्ये दरवाढ समाविष्ट करून प्रस्तावित केलेला आहे. अर्जामध्ये दरवाढ समाविष्ट करुन प्रस्तावित करित नाही .

**मा. आयुक्त सो., :-**

नाही, समाविष्ट सर्व करूनच केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

एखादा मालमत्ता बघा आपण एकच विषय सांगतो. आपण मालमत्ता कर बघा.

**मा. आयुक्त सो., :-**

इनक्युलूड करूनच केलेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब नाही बघा आपण. बघून घ्या. अरे चुका सुधारायला नको.

**मिलन पाटीलः-**

मा. महापौर साहेब. ही बजेटची मिटींग आहे. या बजेटच्या मिटिंगात...

**नरेंद्र मेहता :-**

बजेट संबंधीताचं बोलतोय.

**मिलन पाटील :-**

प्रत्येक नगरसेवकाला आपला विचार मांडायचा अधिकार आहे. तर तुम्ही प्रत्येक नगरसेवकाला ५ मिनिटे, १० मिनिटे जी काही तुम्हाला द्यायची आहे अशी प्रत्येक नगरसेवकाला द्या आणि लाईनशिर घ्या. प्रत्येक वेळी एकच लाईनचा माणूस उठेल आणि बोलेल.

**भगवती शर्मा :-**

प्रत्येक पक्षाला ५-५ मिनिटे टाईम द्या बोलायला.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या ज्या पक्षाची जशी जशी संख्या असेल त्या संख्येच्यानुसार टाईमिंग देण्यात यावा.

**मा. महापौर :-**

याठिकाणी सन्मा. शरद पाटील आपण एकाच टेबलावर उठून बोलू सगळे बोलू ना. सर्वांनुमते सांगितल्याप्रमाणे ५ मिनिटे सर्वांना बोलायला मिळतील. हे बजेट आहे आणि शहराचा विकास करण्यासाठी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मुद्दा बघा टेकनिकल पाणी पुरवठात ३ रू. वाढ केलेली आहे आणि त्याने बघा ३ रू. वाढ करून ४५ कसे रेव्हिन्यू व्हायला पाहिजेत आणि आपण ३० करोड दाखविलेले आहे. बघा तरी उघडून आपण मग आम्ही चर्चा कशावर करायची वाढ वर कि बिगर वाढ वर? आपण बघा तरी.

**मा. महापौर :-**

अहो चर्चा करूनच सर्व विषय...

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब. आहे, पण एकदा पाणी पुरवठा पेज उघडून बघा, त्यामध्ये आपण ३० करोड सुचविले आहेत. पाणी पुरवठा दरात ३ रू वाढ केलेली आहे. बघा तरी आपण

**मा. महापौर :-**

प्रत्येकाने ५-५ मिनिटे बोला.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब ५ मिनिट मोजून ठेवा तुम्ही.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब ह्यावर ५ मिनिट बोलायच की १० मिनिटे बोलायचे हा विषय नाही आहे. आपण पाणीपट्टीत दर वाढ केलेली आहे. मग त्याच प्रॉफिट पण व्हायला पाहिजे ना. तुम्ही १० रू चा धंदा केला गेल्यावर्षी आणि त्या १० रू.चा भाव आता २ रू आणि आता ४ रू. केला २० रू. धंदा केला तर प्रॉफिट किती होईळ. ते प्रॉफिट वाढेल ना त्यात

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब आपण स्वतः उघडून बघा ते बजेट. पाणी आपण जे दाखवलेले आहे ते ३० करोड रूपये तर ७ रू. प्रमाणे आहे. आणि आपण ३० करोड प्रस्तावित केलेले मा. आयुक्त म्हणून, तो ७ रू प्रमाणे आहे. एखाद्या आपण त्यात ३ रू. वाढ केली तर त्याचे ४५ करोड रू. व्हायला पाहिजेत.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, पाणीपट्टीचे ३० करोड ८२ लाख होतात. त्यामध्ये मा. स्थायी समितीने ३४ करोड २८ लाख केलेले आहेत. पाणी पुरवठा लाभ कर आहे. त्याचा वाढीव टॅक्स ११ कोटी केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

नाही, तो लाभ कर मी बोलत नाही. पाण्याच्या दर वाढी बद्दल मी बोलतोय.

**मा. आयुक्त :-**

पाणी पुरवठा दर वाढीमध्ये ४ कोटी २८ लाख वाढ केली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब मला एक सांगा, ८६ एमएलडी ३० करोड होतात. बजेट ७ रू. च्या हिशोबांनी आणि ऑलमोस्ट आपण आता दिडपट केलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

३ रू. ची

**नरेंद्र मेहता :-**

१५ कोटी कंन्टीन्यु वाढवायला पाहिजेत ते कुठे आहेत.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यातच ४ कोटी २८ लाख रू. आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

अरे म्हणजे १५ कोटी म्हणजे नक्की काय हे आम्हाला कळायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

४ कोटी वर आणि खालचे ११कोटी असे १५ कोटी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

८ टक्के वेगळे आहे. आपण जे ३ रू.मा. आयुक्त साहेब......

**मा. महापौर :-**

'अ' पासून बोलायला सुरूवात करा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब आम्ही जे टेक्नीकल सुचना आपल्या करतो. महानगरपालिकेच्या हितासाठी फायद्यासाठी.....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता आपल्याला 'अ' पासून सुरूवात करायची आहे. मधले प्रश्न घेता येणार नाही. कारण बाकीचे प्रश्न राहतील तरी प्रथम 'अ' पासन सुरूवात करायची आहे..

**नरेंद्र मेहता :-**

नविन रेट प्रमाणे आहेत की जुन्या रेटप्रमाणे आहेत. याची माहिती तर पाहिजे.

**मा. महापौर :-**

ती माहिती देणार आहेत तुम्हाला.

**नरेंद्र मेहता :-**

मग द्याना, त्याशिवाय आम्ही चर्चा करू.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, पाण्याचा बजेट उघडून बघा म्हणजे आपल्या लक्षात येईल.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर साहेब पेज वाईज सुरू करा तुम्ही.

**शरद पाटील :-**

पेज वाईज सुरू करायला हरकत नाही. पहिले वाढीव दरावर बोलायचे आहे की आहे त्या दरावर बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

दुसऱ्याला बोलू देणार आहेत की तुम्हीच बोलणार आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टेक्नीकल मुद्दा अहे. टेक्नीकल मुद्दा तर क्लिअर करा. टेक्नीकल मुद्दा आयुक्त सोा., .......

**मा. महापौर :-**

टेक्नीकल तुम्ही असताना गेली अडीच वर्ष टेक्नीकल केलेली तुम्ही ते सर्व बघितले. बसा आपण.

**(सभागृहात गोंधळ)**

**शरद पाटील :-**

आपण बोलताय ते खर आहे. ते मान्य करतो. आपलं आधळं दळतंय नी कुत्रं पीठ खातंय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर प्रशासनाला माहिती नाही की काय कारवाई केली आहे काय फिगर द्यायला पाहिजे. सांना ना, प्रिटींग मिस्टीक झालेली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, दोन मिनिटात विषय संपेल.

**शरद पाटील :-**

आपला जर मुद्दा लक्षात आला असेल.....

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब महत्वाचा विषय आहे सभागृहामध्ये आपली आजची बजेटची मिटींग ही आपण टि.व्हि. ला लाईव्ह दाखवतो का? आता बाहेर लाईव्ह टेलिकॉस्ट ह्या बजेटच्या मिटींगची चालू आहे. ती अनधिकृतपणे चालू असेल तर तसे विचारणा करा मला आता माहिती आली आहे की हे लाईव्ह टेलिकॉस्ट बाहेर चालू आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नाही, ना चांगले आहे ना. वाईट कुठे आहे अहो आपण शहराच्या भल्याकरिता बसले आहेत इकडे.............

**प्रशांत पालांडे :-**

अहो सभागृह नेते लोकसभा दाखवतात, विधानसभा दाखवतात.

**जयंत पाटील :-**

लोकांनी बघावे असा तुमचा तमाशा चालला आहे. हा तमाशा तुम्ही लोकांना दाखवतात का?

**प्रशांत पालांडे :-**

तमाशा नाही दरवाढ दाखवतो आहे.

(सभागृहात गोंधळ )

**जयंत पाटील :-**

माझा प्रश्न तो नाही आहे माझा प्रश्न असा आहे की, हे अनधिकृतपणे का दाखविले जात आहे आजी माजी महापौर नरेंद्र मेहता यांचे चॅनल आहे.

**मा. आयुक्त :-**

सभागृहाची परवानगी घेतल्याशिवाय कुठलीही गोष्ट करता येणार नाही. त्याच्यावर कायदेशीर कारवाई होईल.

**नरेंद्र मेहता :-**

माझे नांव घेतले आहे. मा. महापौर साहेब लाईव्ह असे काही होते का? त्याला काही वायरिंग नाही सगळे काही लावावे लागते. त्यानंतर लाईव्ह होते त्याशिवाय लाईव्ह होत नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब सदस्य नरेंद्र मेहताच्या बाबतीत तुम्हाला समजवण्यास काही गरज नाही किंवा सभागृहाला समजवण्याची गरज नाही पण सभागृहाची कुठलीही सुचना आणि मान्यता नसतांना जर ते तसे काही दाखवत असतील तर ते काहीही करू शकतात.

**शरद पाटील :-**

नाही, नाही विरोधी पक्षनेते साहेब आपण सन्मानीय आहात आपण कुठच्याही पुराव्याशिवाय हे बोलणे योग्य नाही. मा. महापौर साहेब मला याच्यावर बोलायचे आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

नाही आम्ही पुराव्याशिवाय नाही. आम्ही म्हणतो की खात्री करा. आम्ही कुठे म्हणतो त्यांनी केले असे.....

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब मला याच्यावर बोलायचे आहे. विरोधी पक्षनेते सन्मानीय आहेत.,

**मा. महापौर :-**

मा. कमिशनर साहेब खात्री करून कारवाई करावी.

**शरद पाटील :-**

नाही मला बोलायचे आहे. याच्यावर प्रत्येक वेळेला कोणावरही आरोप करणे चांगले नाही.

**मा. महापौर :-**

मा, कमिशनर साहेबांनी खात्री करून याच्यावर कारवाई करावी.

**जयंत पाटील :-**

पुरावा पण देतो. म्हणजे हे तुम्ही मान्य केले की, अनधिकृतपणे दाखवले जाते आणि सेव्हन इलेव्हन हे चॅनल कोणाचे आहे. आता ते चॅनल लावून बघा.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब सन्मा. सदस्यांवर जे आरोप केलेले आहेत त्याची व्यवस्थित योग्य माहिती द्या.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, ह्या चॅनल वरती अशा प्रकारची अनधिकृतपणे माहिती दाखविण्या पाठचा उद्देश काय? गेल्या अडीच वर्षामध्ये. तुम्ही या शहराचे महापौर पद भूषविले. तुम्हाला जे काही करता आले नाही आणि ऐनवेळी ज्यावेळेला कर वाढ करण्याचा विषय आला. आम्ही घेतो असे सांगून तुम्ही तो विषय घेतला नाही.

**मा. महापौर :-**

प्रत्यक्ष पहाणी करून चौकशी करून प्रशासनाने याबाबतीत गुन्हा दाखल करावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, अहो लाईव्ह असेल तर गुन्हा दाखल करा साहेब, एखादा लाईव्ह चालू असेल. मा. महापौर साहेब विनंती अशी आहे. सव्वा बारा झालेले आहेत. सव्वा बारा वाजले आहेत दर वर्षी पेज वाईज बजेटची सुरूवात होते. सचिवांना पहिल्यांदा पेज वाईज नंबर घेऊन बजेटची सुरूवात करायला सांगा आणि जे काही लाईव्ह टेलिकास्ट आहे ते जर का अनधिकृत असेल तर कारवाई करा पण माझी अशी विनंती आहे की, या सभागृहामध्ये काय चालते आपण शहरा करिता काय चांगल वाईट करतो हे जर नागरिकांना कळणार नसेल तर परवानगी देऊन दाखवायला सुरूवात करा. म्हणजे सभागृहामधील नगरसेवकांना शिस्त लागेल. जो कोणी वाटेल तसा आगाऊ पणाने बोलतो त्यालाही शिस्त लागेल, जे कोणी अपशब्द वापरत असतील त्यांनाही शिस्त लागेल म्हणजे नागरिक त्यांना जबाब विचारू शकतील. सव्वा बारा झाले. अकरा वाजल्यापासून सव्वाबारा झाले. म्हणजे सव्वा तास झाला कारवाई झालेली नाही. तुम्ही पेजवाईज सुरू कराना अजून अख्खा दिवस जाणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. पिठासीन अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका सन २००९-१० चे सुधारित व सन २०१०-११ चे मूळ अर्थसंकल्पा बाबत मा. आयुक्तांनी निवेदन केलेले आहे. हे पहिलेच पान आहे. ह्या बजेट वरच या निवेदनाबाबत मी काही स्पष्टीकरण मागत आहे. आपण भुयारी गटार योजनेसाठी ३३१.४२ कोटीची मंजूरी घेतलेली आता ती ४९१.९८ कोटी रू. ही वाढीव मंजूरी झालेली आहे. आताच्या अर्थसंकल्पात दाखविली आहे ती ४९१.९८ कोटी रू. दाखविलेली आहे. आता १६०.४८ कोटी रू. जे भुयारी गटारी योजनेवरती वाढीव खर्च होणार आहे. तो सगळा वाढीव खर्च आपण मनपाच्या हिश्श्यामध्ये दाखविलेला आहे. आणि मग तो मनपाच्या हिश्श्यामध्ये टोटल २४६ रू. कोटी रू. खर्च करावयाचे असतील तर त्याचे आपण नियोजन कसे करणार, त्याची तरतूद कशी करणार जर त्या १६०.४८ कोटी रू. मध्ये केंद्र शासन व राज्यशासन जर ५० टक्के हिस्सा देणार असेल तर तशा बाबतीत लेखी त्यांनी परवानगी दिल्याचे किंवा तसे मंजूर केल्याचे आपण कळवावे. कारण ह्या ठिकाणी जर २६० कोटी रू. २४६ कोटी रू. ६६ कोटी रू. त्यामध्ये २२६ कोटी रू. आपण कर्ज घेताय. एम.एम.आर.डी.ए. चे ही टोटल ऐवढ्या रकमेची आपल्या वरती जबाबदारी पडणार आहे. मग त्यानुसार आपल्या बजेट मध्ये त्याचा किती इफेक्ट होईल. आणि जर १६० कोटी, १६०.४८ कोटी जर केंद्रशासन ्आणि राज्यशासन ५० टक्के म्हणून हिस्सा देणार असेल तर तशी आपण मंजूरी घ्यावी. त्यानंतर आपण ह्या योजनेसाठी एम.एम.आर.डी.ए कडून २२६ कोटी रू. च कर्ज घेतलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे हे कर्ज घ्यायला मा. महासभेची कोणीही मंजूरी दिलेली नाही. व या मा. महासभेपुढे हा विषयच आलेला नाही आणि आपण कर्ज घेतल. महासभेपुढे विषय घेऊन त्या कर्जाला मंजुरी घेऊन म्हणजे पहिले कर्ज घेण्याच्या प्रस्तावाला मंजूरी घेऊन मग कर्ज घ्यायला पाहिजे होते की, अगोदर कर्ज घ्याव आणि नंतर मंजूरी घ्यायची विषय आहेच नाही इथे. २०१०-११ ला आपण जे आता कर्ज परत ऑलरेडी आता ते २२६ कोटी रू. मध्ये किती कर्ज आपल्याला प्रत्यक्ष मिळालेले आहे. ५० कोटी मिळाले आहे की किती मिळालेले आहे? कर्ज माझे ४ प्रश्न आहेत. एकूण ४९१.९८ रू मध्ये १६०.४८ कोटीची वाढीव मंजूरी आपण घेतली आहे का? १६०.४८ कोटी रू. जे जास्त खर्च होणार आहेत ते मनपाच्या हिश्श्यातून घेणार आहेत असे आपण निवेदनात म्हटलेलं आहे. मग त्यामध्ये राज्यशासन व केंद्रशासनाचा वाटा मिळणार आहे की नाही, मिळणार असेल तर त्याची मंजूरी आहे की नाही, ही योजना अंमलात आणण्यासाठी महासभेचा कुठलाही प्रस्ताव किंवा कुठलीही मंजुरी नसताना ठराव नसताना २२६ कोटी रूपयांचे कर्ज घेतलेले आहे. तर या २२६ कोटी रूपयाच्या कर्जाची परत फेड कशी त्यांच्यामध्ये मॉरेटियम पिरीयड किती आहे. मॉरेटीयम पिरीयड कर्ज घेतल्यानंतर अमूक अमूक महिन्यापर्यंत हप्ता किंवा इन्ट्रेस भरायचे नाही आहे. तसेच जेइन्ट्रेस असेल ते आपल्या अकाऊन्टवरकडे क्रेडीट होईल. आणि साधारण एक वर्षाच्या कालावधीनंतर आपल्या कर्जाचे हप्ते भरायचे त्यासंदर्भात कुठचीही माहिती यांच्यामध्ये दिलेली नाही. परंतु मंथली आहे. त्रैमासिक आहे म्हणजे मासिक हप्ता आहे. त्रैमासिक हप्ता आहे. यासंबंधी सुध्दा माहिती नाही तो हप्ता कधीपासून भरायचा आहे. यासंबंधी सुध्दा माहिती नाही किती वर्षात कर्ज परत फेड होईल. त्यासंबंधी माहिती नाही आहे. एसटीपी प्लॅन्ट मधून आपल्याला जे आपण म्हणतो जे निघणारे पाणी आहे. म्हणजे प्रक्रिया होऊन आपण जे वितरित केल्यावर गार्डन आणि शौचालयाच्यासाठी आपल्याला वापरता येईल. त्यासंबंधी योजना काही सादर केलेली नाही. म्हणजे जे पाणी आपण फुकट देणार कि विकत देणार लोकांना त्यांचा रेट काय असेल याचा बजेट वरती काय परिणाम होईल. कारण त्यांचा बजेटवरती परिणाम होणार आहे. त्याचे उत्पन्न आपल्याला मिळणार आहे ते उत्पन्न या ठिकाणी दाखविणे गरजेचे होते ते आपण दाखविलेले नाही. त्यांची यावर्षात फ्लॅन्ट चालु होणार नाही किंवा होणार आहे. यासंबंधी काही माहिती नाही. एसटीपी प्लॅन्टचे काम आपण साधारण त्यांना वर्क ऑर्डर दिल्यानंतर आपण त्यांना काही ॲडवान्स पेमेंट केल्यानंतर आजच्या स्थितीमध्ये त्या एसटीपी प्लॅन्टची कामे कुठे कुठे सुरू आहे. आणि कशी कशी सुरू आहे. त्यासंबंधी कुठली माहिती नाही आता हा एक विषय त्यांच्यानंतर दुसरा निर्मल योजनेत आपण एक वाहन सफाई हा एक विषय ठेवलेला आहे. या महानगरपालिकेमध्ये हे मॉईक चालू आहे काय?

**भगवती शर्मा :-**

जयंत पाटीलने एक सूचना मांडी थी की, यहा का लाईव्ह टेलीकास्ट हो रहा है। और अभी तक उसपर कोई कार्यवाही नही की, महापौर महोदय, अपने खाली आदेश दिया इसका पिछे लाईव्ह टेलीकास्ट हो रहा है।

**जयंत पाटील :-**

प्रशांत तो कॅमेरा तेथे लावलेला आहे. ताबडतोब पोलिसांना बोलून घ्या.

**भगवती शर्मा :-**

कॅसेट खाली किजीये और उसकी जॉच करके अगली मिटींग शुरू किजिये।

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. महापौर साहेब, यांची तकलीफ काय आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर आपण शहराचे प्रथम नागरिक पीठासीन अधिकारी आहात....

**नरेंद्र मेहता :-**

लाईव्ह असेल तर माझी तक्रार करा माझ्यावर गुन्हा दाखल करा.

**आसिफ शेख :-**

आपल्या परवानगी शिवाय एक शिपाईसुध्दा आत मध्ये येता कामा नये. अधिकारी आणि त्यांची गोष्ट राहिली दुर. सभागृहाचे कामकाज सुरू असताना. पिठासीन अधिकारी या नात्याने मा. महापौर या नात्याने आपली परवानगी घेतली पाहिजे. आणि परवानगी न घेता बेकायदेशीररित्या याठिकाणी लाईव्ह टेलीकास्ट होत असेल तर अत्यंत ती दुर्देवाची, खेदाची बाब आहे. अगोदर त्यांनी परवानगी घेतली पाहिजे. लोकशाही प्रक्रियेमध्ये सर्वांना तसा अधिकार आहे. परंतु परवानगी घेतली पाहिजे आपल फक्त मतदान सुरू असते टि.व्हि वाले येतात. कॅमेरे, इलेक्ट्रॉनिक, चॅनेलवाले येतात पण निवडणूक प्रक्रिया संपल्यानंतर ते याठिकाणी येऊन चित्रिकरण करतात. पण असं परस्पर पिठासीन अधिकाराची परवानगी न घेता, महापालिकेची परवानगी न घेता अशी पध्दतीने जर सन्मानिय, माजी महापौर माझे चांगले मित्र आहे. आम्ही त्यांचा आदर करतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर सोा., :-**

सचिवानी ताबडतोब गुन्हा दाखल करावा.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर सोा., प्रेक्षक गॅलेरी मधून रेकॉडींग करतोय. ताबडतोब कॅमेरा जप्त करून त्या माणसाला ॲरेस्ट करा. नंतर कळेल तो कॅमेरा कोणाचा आहे. ताबडतोब ॲरेस्ट करा. आणि कॅमेरापण जप्त करा.

**आसिफ शेख :-**

बजेटची मिटींग आहे.

**मा. आयुक्त सोा., :-**

टेलीकास्ट कोण करतोय बघा जरा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर सोा., पॉवरचा वापर करा ना कधी करणार.

**मा. महापौर सोा., :-**

सिक्युरिटीनी कॅमेरा ताबडतोब जप्त करा.

**मा. महापौर सोा., :-**

सर्वांना माहिती आहे की आपण अति हुशार आहात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अहो, खाससभा बोलवाना?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुमच्या परवानगी बोलतेय की, टि.व्हिला दाखविता ना तर आपण इथं खोट काम करीत नाही. एक मिनिट पण या साडेसात वर्षामध्ये कधीही असे घडले नाही या साडेसात वर्षामध्ये ७ वेळा अजेटच्या मिटींग लागल्या. दर वर्षाला लागते. तेव्हा त्यांना का नाही वाटलं बरं की टि.व्हीला दाखवावे म्हणून मा. महापौर सोा., आम्हाला घरी कामे आहेत. टाईमपास करू नका?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज नियमाप्रमाणे काम होत आहे.

**मा. महापौर सोा., :-**

नियमाच्या गोष्टी करू नका? परवानगी घेतली नाही म्हणून. परवानगी घेतली का आपण गुन्हा दाखल करा कायदेशीर.

**नयना म्हात्रे :-**

अहो या अडीज वर्षामध्ये कोणी घेतली का परवानगी आणि आता कशाला कॅमेरावाला बोलून शुटींग करावी म्हणून....

**मा. महापौर :-**

खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पाडायची परंतु हे काय चालले आह?

**भगवती शर्मा :-**

प्रत्येक को प्रमाण की जरूरत है साहब. खाली टाली पिटनेसे पत्ता चल जाएगी यहॅा कुछ ना कुछ गडबड है। डालमे काला है।

**जयंत पाटील :-**

त्याचा कॅमेरा तोडून टाका इथेच.

**चंद्रकांत मोदी :-**

किसका हात है उसमें उस के उपर गुन्हा दाखल करियें साहब।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, त्या बिचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यापेक्षा त्याला कोणी बोलवले ते त्याला विचारा. नाही नाही विचाराना त्याला कोणी बोलवले ते. तो नाव सांगेलना त्याचे...

**मिलन म्हात्रे :-**

त्याला पोलिसाच्या ताब्यात द्या.

**प्रफुल्ल पाटील :-**

भुयारी गटार योजनेवर एकूण १६०.४८ कोटी रू. वाढीव तरतूद केलेली आहे. ही तरतूद केल्यानंतर सगळा मनपा हिश्श्यातून हा खर्च करावयाचा आहे. असे आपल्या निवेदनात आहे. त्यानंतर वॉर्ड साफ सफाईसाठी मागील अंदाज पत्रकामध्ये २२ कोटी रू.ची तरतूद होती. आणि या वर्षी त्यावर २० कोटी आणलेली आहे. परंतु स्थायी समितीने ती १६ कोटी वरती केलेली आहे. आणि आपल्याच निवेदनात आपण अस म्हटलेले आहे. किमान वेतन हे १४१ रू ऐवजी २११ रू. झालेले आहे. ठेकेदाराने किती लेबर लावावे जी आज आपण काढून टाकावे असही म्हटलेले आहे. आणि एकूण ९ कोटीची बचत आपण करणार आहात असही आपण निवेदनात म्हटलेले आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. प्रफुल्ल पाटील साहेब उसके पास व्हिडिओग्राफर है वो इधर खडा है दरवाजे के पास मा. प्रफुल्ल पाटील साहेब एक मिनिट रूकिये उसके पास व्हिडिओग्राफ है। किसके हातोसे किया उसको भी अॅरेस्ट किजीए।

**प्रफुल्ल पाटील :-**

शहरातील एकूण गटारे, नाले व रस्ते यांची लांबी किती? बर्मन मिटींगच्या शिफारीनुसार किती मजुरांची आवश्यकता आहे. आपल्याकडे मनपाचे व ठेकदाराचे मिळून किती मजुर उपलब्ध आहेत. औषधे व धुरफवारणीची व्यवस्थापन कामे याची बाब त्यामध्ये धरलेली आहे का? आणि यासाठी तरतूद केली असल्यास ती किती रक्कमेची हा संपूर्ण वॉर्ड साफसफाई वरती माझा प्रश्न आहे. निर्मल एम.एम.आर. योजना जी आहे शौचालय योजना त्याच्यामध्ये मागील आर्थिक वर्षामध्ये २०.०३ कोटी इतके अनुदान आपल्याला मिळाले होते आणि यावर्षी आपण २०१०-११ ला १५ कोटीची तरतूद केलेली आहे म्हणजे ही तरतूद कमी का झाली एवढी २० कोटीची का नाही केली. जर आपण १५ कोटीची तरतूद केलेली आहे. तर त्याचा बेस काय पकडायचा? म्हणजेच शौचालयाची ठिकाणे खर्च निश्चित केलेली आहेत का? आणि त्या ठिकाणचा खर्च निश्चित केला आहे का? मोघम १५ कोटीची रक्कम फायनल केली आहे का? मोघम १५ कोटीची रक्कम फायनल केली मग १५ कोटी केली असेल तर २० कोटी का नाही केली कारण आपल्याला संपूर्ण रक्कम ही एमएमआरडीए देते यामधून बी.एस.यु.पी. योजनेबाबत फार अतिशय गमंतीकारक ह्या अंदाजपत्रकामध्ये, अंदाजपत्रकातच चित्र उलटं दिसते आहे. आपल्या निवेदनात आपण जर वाचले तर बी.एस.यु.पी. योजना ही किती वर्षात पूर्ण करायची आहे आणि आपण किती वर्षात पूर्ण करायची आहे आणि आपण किती वर्षात पूर्ण करणार. त्यानंतर मा. स्थायी समितीने जे अंदाजपत्रक मंजूर केलेले आहे. ह्या स्थायी समितीमध्ये ह्याला वर्षानुर्षेचा कालावधी गेलेला आहे असे एकंदरीत परिस्थिती दिसते आणि म्हणून बी.एस.यु.पी. योजनामध्ये ही जी शासनाची अट आहे आपल्याला की केंद्र सरकारची ती योजना दोन वर्षात पूर्ण करायची आहो आणि दोन वर्षात पूर्ण करण्यासाठी आपण त्यावरती त्यानुसार येणारा खर्च किती आहे तो आपण नमुद केलेला आहे. केंद्र सरकारकडून २२३.२० कोटी रूपये एकुण योजनेवरती दोन वर्षात खर्च हे मिळणार आहे अनुदान मिळणार आहे त्याच्यामध्ये मनपाचा हिस्सा ३०.६९ कोटी आणि लोक वर्गणी २५.११ अशी २७९ कोटीची बी.एस.यु.पी.ची. योजना आपण दोन वर्षात करणार आहोत. दोन वर्षात ४१३६ घरे आपण बांधणार आहोत. पण आपण काय केलेले आहे याचे दोन पार्ट केलेले आहेत १११.६० कोटी आणि दुसरे १५.३५, १२.५५ आणि १३९.५० अशी दोन वर्षात ही योजना पूर्ण करण्याचे आपण ठरविलेले आहे. खाली जेव्हा आपण त्याच्यामध्ये पी अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे त्याच्यामध्ये केंद्र शासन व राज्यशासन असे अनुदान ४८.२१ कोटी केलेले आहे. मनपाचा

हिस्सा ६.६२ कोटी आणि लोक वर्गणी ५.४२ कोटी मग स्थायी समितीच्या बजेटमध्ये फक्त ३ कोटी तरतूद दाखविलेली आहे. ती तरतूद ६.६२ कोटी दाखवायला पाहिजे. आपण जेव्हा मनपाचा हिस्सा ३०.६९ कोटी दाखवला होता तर तो दान वर्षाचा म्हणजेच प्रत्येकी १५.३५ कोटी या वर्षात जर आम्ही तरतूद केली तर बी.एस.यु.पी.ची योजना दोन वर्षात पूर्ण होईल. पण आपण तसे न करता १५ चे पुन्हा दोन पार्ट केलेले आहेत तर ६.६२ कोटी मनपाचा हिस्सा आपण बी.एस.यु.पी. योजनेवर घेतला आहे म्हणजे आपल्या योजनेनुसार, तुम्ही जे नियोजन केलेले आहे की बी.एस.यु.पी.ची योजना पूर्ण करण्याची तर आपल्या नियोजनानुसार आपण ६.६२ कोटी प्रस्तावित केलेले होते आणि त्यानुसार चार वर्षात ती बी.एस.यु.पी. योजना येणार होती. पण तुम्ही जर स्थायी समितीची शिफारस पाहिली तर थोडेसे चमत्कारिक वाटते त्यांनाच माहिती की त्यांनी तसे का केले ते स्थायी समितीमध्ये फक्त ३ कोटीची तरतूद केलेली आहे. मनपा हिश्श्याची म्हणजे ३ कोटीनुसार आज जर मंजुरी दिली तर ही योजना पूर्ण व्हायला आठ वर्षे पूर्ण लागतील. मग दोन वर्षानंतर केंद्रशासनाची योजना पुढे चालु राहणार आहे का? आणि ही योजना तुमची जर दोन वर्षात पूर्ण करू शकला नाहीत तर आणि फक्त $^{१}/_{८}$ योजना म्हणजे पंचवीस टक्के पण येत नाही सर, साडे बारा टक्के ही योजना पूर्ण झाल्यानंतर बंद पडली तर आपली परिस्थिती काय होईल. लोकांना आपण स्थलांतरीत करणार, त्यांना रहायला जागा देणार किंवा भाड्याने देणार जे काही आणि टेंडरची प्रोसेस ऑलरेडी यामध्ये झालेली आहे. आणि म्हणून आज जे स्थायी समितीने यामध्ये अंदाजपत्रकामध्ये तरतूद केली आहे. कदाचित त्यांना विसर पडला असेल की ही योजना दोन वर्षात पूर्ण करायची आहे. आणि म्हणून जर दोन वर्षात पूर्ण करायची झाली तर आम्हाला १५.३५ कोटीची तरतूद करणे आवश्यक आहे. नाहीतर ही योजना फेल होणार आहे. किंबहुना ही योजना हाती न घेतलेली परवडली बी.एस.यु.पी. योजने नंतर कर्ज निर्वारण निधी आपण म्हटलेले आहे. ५० एम.एल.डी. पाणीपुरवठ्याचे कर्ज आपल्यावरती आहे. आपण अनेक कर्ज घेणार आहे. बरोबर आहे. कर्ज घेतल्याशिवाय धंदा वाढत नाही. म्हणजे विकासाची कामे पण होत नाही. मग कर्ज घेताना आपली पेमंट करण्याची म्हणजे कर्ज फेडण्याची आपली क्षमता आहे की नाही हे सुध्दा आपल्याला बघायला पाहिजे. एम.एम.आर.डी.ए. ने आता आपल्याला कर्ज देणे जवळजवळ बंद केलेले आहे. तत्पूर्वी आत्ताचे जे भुयारी गटार योजनेचे जे हप्ते चालू होणार आहे. त्यानंतर सद्याचे कर्ज आपण घेतलेले आहे त्या कर्जाची परत फेड करण्यासाठी कर्ज निवारक निधी आपण करतो की नाही? ५० एम.एम.डी. पाणी पुरवठा योजनेअंतर्गत कर्ज घेतले होता त्याचा हप्ता ७१५.९४ लाख आहे. म्हणजे ६० कोटी १५ लाख रू. आपला हप्ता आहे. ५० एम.एल.डी. पाणी पुरवठ्याच्या आणि त्याच्यावरती कर्ज निवारण निधी मध्ये आपण २६४ लाख म्हणजे २ कोटी ६४ लाखाची आपण तरतूद केलेली आहे. आता उर्वरित ४.९१ म्हणजे ४९१.९३ लाख टोटल ७१५.९४ लाख तुम्हाला २०१०-१० ला भरायचे आहे. एम.एम.आर.डी.ए.ला कर्ज निवारण निधीमध्ये फक्त आपण २६४ लाखाची तरतूद केलेली आहे. ४९१.९३ लाखाची तरतूद करणे आवश्यक आहे. आणि मग आपण ती करणार कशी? एक ५० एम.एल.डी. पाणी पुरवठ्याचे झाले. दुसरा छत्रपती शिवाजी महाराज मार्ग बनविण्यासाठी कर्ज घेतल होत त्याची एकूण ३३४.०३ लाख कर्ज आणि कर्ज निवारण निधीमध्ये आम्ही हे कर्ज फेडण्यासाठी कर्ज निवारण निधी मध्ये आम्ही हे कर्ज फेडण्यासाठी कर्ज निवारण निधी मध्ये एकही पैसा जमा केलेला नाही. मग हे पैसे कुठून आणणार तुम्ही. सदर रक्कम आपल्याला जी भरायची, परत फेड करायची ती तरतूद आपण कशी करणार, कुठल्या हेड खालून करणार? समजा, ठीक आहे आपण टॅक्स वाढवू तेव्हा वाढवू पण करणार कशी परतफेड. तुमच्या़ कर्ज निवारणमध्ये तशी तरतूद नाही. खर म्हणजे कर्ज निवारण जेव्हा जेव्हा आपण कर्ज घेतो ताबडतोब कर्ज निवारण निधीमध्ये अमूक टक्के रक्कम आपण वर्ग करायला पाहिजे. आणि प्रत्येक वेळी हप्त्याच्या कर्ज निधीमधून करायला पाहिजे. कर्ज निवारण निधीची जी रक्कम आहे. ती आपण एफडी मध्ये ठेवतो. कारण ती वापरू नये.जनरल फंडातून दुसऱ्या भुयारी गटार योजनेत कर्ज व्याजाचे १०९८.१६ लाख देय आहे. म्हणजे २०१०-११ ला आपली योजना सुरू झालेली नाही आहे. भुयारी गटाराचे कर्ज आपल्याला व्याजासहित १०९८ लाख आपल्याला भरायचे आहे. योजना कधी होईल. दोन वर्षानी होईल, चार वर्षानी होईल पण आपल्याला कर्ज १०९८ लाख द्यायचे आहेत.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब वह जो आदमी पकडा गया उसका नाम तो बताईए। कमसे कम सदस्योंको मालूम तो पडेगा. वह अभी भी बाहर खडा है।

**मा. महापौर :-**

राजकुमार शहा, सेवन इलेव्हन कंपनीचा माणूस आहे. त्याच्यावर ताबडतोब कारवाई करण्यात येणार आहे.

(सभागृहात गोंधळ )

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब सेवन इलेव्हन ही कंपनी कोणाची आहे.

**मा. महापौर :-**

माजी महापौर नरेंद्र मेहता.

**जयंत पाटील :-**

कारवाई करणार तर माजी महापौरांवर पण केली पाहिजे. त्यांना पण बाहेर काढा.

**नरेंद्र मेहता :-**

आरोप लावायचा असेल तर अधिकारी आहे माहिती घ्या नंतर मला सांगा.

**मा. महापौर :-**

अहो माहिती घेऊनच सांगितली.

**नरेंद्र मेहता :-**

माहिती घ्या नंतर बोला.

**एस. ए. खान :-**

त्यांचा माणूस आहे ना त्यांच्यावर पण गुन्हा दाखल करा आणि सभागृहाच्या बाहेर काढा. आरोपपत्र ऑलरेडी दाखल हुआ है।

**मा. महापौर :-**

शिवगुंडेने माणूस पाठवलेला आहे. त्याला पोलिसांच्या ताब्यात दिलेला आहे. त्याने मालकाचे नाव सांगितले आहे. मालकावर कारवाई केली जाणार आहे. अहो आत्ता पर्यंत त्याच नाव होत. आम्ही गावची लोक आहोत. आम्ही बाहेरून आलेलो नाही.

**रामनारायण दुबे :-**

मा. महापौर साहेब, मिरारोड के पोस्ट ऑफीस मे पोस्ट ऑफीसका ऑफीसर पकडा गया और जिसमे महापालिका का मिलीभगत २ करोडका आरोप सी.बी.आय. ने पकडा यह जो विषय है वह गंभीर नही है क्या?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रामनारायण दुबेजी जरा ख्याल करो की आज बजेटकी बात करनी है और आप पोस्ट का अधिकारी पकडा उसकी बात कर रहे है।

**रामनारायण दुबे :-**

मा. महापौर , ये दो-दोन, चार-चार करोडो रूपयोंका घोटाला है उसपरभी ध्यान देना चाहिए। उस तरफ नही ध्यान दे रहे है। कॅमेरा के पिछे आपको जो दो-करोड का घोटाला हुआ......

**मा. महापौर :-**

वो सन्मा. सदस्य दुबेजी आपण बसा.

**शरद पाटील :-**

तुम्ही शिस्त बरोबर लावाल असे आम्हाला वाटतेय आणि खरच चांगले बोलताय तुम्ही.

**मा. महापौर :-**

मला कोणी शिकवू नये. मी सात निवडणूका लढलेलो आहे. मला कोणी न्याय शिकवू नये इथे.

**शरद पाटील :-**

अहो साहेब मला खात्री वाटते म्हणून बोललो.

**मा. महापौर :-**

आपण गावचे आहात. चला बसून घ्या आता.

**मिलन म्हात्रे :-**

चला, कामाला सुरूवात करा, बोलू द्या. सन्माय नगरसेवक प्रफुल्ल पाटीलांना.

**प्रफुल्ल पाटील :-**

भुयारी गटार योजनेबाबत वाढीव तरतूद आणि वाढीव तरतूदीमध्ये नगरपालिकेचा किती हिस्सा त्याच्यामध्ये वाढीव तरतुदी आहेत त्यामध्ये केंद्र शासन राज्यशासनाचा हिस्सा मळणार आहे की नाही याबाबतचा लेखी खुलासा त्यानंतर जे पहिले लोन घेतले २२६ कोटी रू. त्या महानगरपालिकेने कुठली मंजूरी नाही त्या संबंधी स्पष्टीकरण करावे. आणि हे कर्ज आता आपल्याला १०९६ लाख रू. या वर्षामध्ये भरायचे आहेत त्याची आपण तरतूद कशी केलेली आहे. इतर सर्व कर्जांचा तपशील दिलाय. मी आपल्याला वॉर्ड साफसफाई बाबत जे निवेदन दिले आहे त्याची माहिती आपण द्या. निर्मल एम.एम.आर. शौचालय बाबत एकूण आपल्याकडे एक भुयारी गटार योजनेबाबत, वॉर्ड साफसफाई बाबत दोन, तीन निर्मल एम.एम.आर शौचालय योजना, चार बी.एस.यु.पी योजना आणि पाच कर्ज निवारण निधी. मा. आयुक्तांच लक्ष नाही. म्हणजे मी हे निवेदन केलेले आहे ते आपल जे निवेदन आहे. बजेटमध्ये त्याच्या आधारे मी निवेदन केलेले आहे. त्यामध्ये आपण बरचसे मुद्दे घेतलेले आहेत. काही निवडक मुद्दे भुयारी गटार योजना, एम.एम.आर.डी.ए. २२६ कोटीचे कर्ज, वॉर्ड साफसफाई, निर्मल एम.एम.आर.डी.ए. ची शौचालय योजना, बी.एस.यु.पी.योजना आणि कर्ज निवारण निधी या संदर्भात जे प्रश्न विचारले आहेत त्याच स्पष्टीकरण व्हावे. आणि पुढे माझे काही प्रश्न आहेत. आणि सर्वात महत्वाचा विषय असा आहे की गेली सात वर्ष आम्ही एका विकास योजनेची तरतूद आर्थिक अंदाजपत्रकात दरवर्षी करत आलो ते म्हणजे जैसल पार्क येथील भाईंदर (पू.) आणि पश्चिमेला जोडणारा सब-वे अतिशय वाईट वाटते मला की, आता आमच्याच पक्षाची सत्ता आहे आणि भुयारी सौकेट गुल

झाला कुठे? म्हणजे ही अतिशय खेदाची बाब आहे. गेली साडेसात वर्ष दरवर्षी याठिकाणी ५-५ कोटी रू. आम्ही तरतूद केली. गेल्यावर्षी तो सबवे वेगळ्या पध्दतीने करा म्हणून ४० कोटीची मंजूरी दिली गेली. आणि यावर्षी अंदाजपत्रकातून आज सबवेच गुल झालेला आहे. आमच्या पक्षाच किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच शासन असताना आमचे नगरसेवक त्या विभागातून प्रतिनिधीत्व करत असताना हा सबवे गुल होण ही अतिशय खेदाची बाब आहे. आणि तो गुल का झाला हे बाजूला घ्यावा आणि तो कसा करता येईल आणि त्याची मंजूरी. माझे असे मत आहे की, साहेब मी पूर्वीपण तुम्हाला बोललो होतो की आपण पूर्वी जे सुरूवातीला अंदाजपत्रक केले होते ते ५ कोटीचे तर ते ९ कोटीवरती आले. तो आपण बाजूला ठेवून ४० कोटीचे आपण बेसपुशिंगचा स्कीम आपण आणायला गेलो बेसपुशिंग बाबत आपण माहिती काढली ही दोन मायक्रोटॅनेलिंग बेसपुशिंग. मायक्रोटॅनेलिंगची मशिन त्यांच्याकडे आहे. दोन वर्षापर्यंत काम आहे. दोन वर्षानंतर तो काम आपल्या हाती घेईल. आणि २ वर्ष आपण थांबू शकत नाही. म्हणून आपण दोन्ही बाजूने रेल्वे समांतर आर ओ बी कडून तिथे क्रॉसिंग करा त्यांचा खर्च १४ ते १५ कोटीच्या आत मध्ये येईल. या वर्षीच्या बजेटमध्ये ८ कोटी रू. तरतूद करावी पुढच्या वर्षीच्या बजेटमध्येपण ८ कोटीची रू. करावी म्हणजे दोन वर्षात होईल. आता सबेच्या मागे राहीले तर आता सबवे बनविला रेल्वेने फाटकाजवळ त्यांची परिस्थिती आता अशी आहे की, आता मे महिन्यामध्ये जवळपास एक दिड फुट पाणी प्लस तो इतका असुरक्षित आहे. रोज येथे चोऱ्यामाऱ्या होतात बाई-माणसं तर सोडून द्या, पुरूष पण रात्री कोणीच जात नाही. तेव्हा या सबवेचा तांत्रिक दृष्ट्या इवन बेस पोसींग साशंकता आहे. कारण त्याचा रूंदीचा ९ मीटरपेक्षा जास्त आहे. ९ मीटर आहे ना. म्हणजेच १० मीटर जवळ जवळ रूंदी असायला म्हणजे मायक्रोटेनिलिंग पण त्या ठिकाणी परफेक्ट होईल किंवा नाही त्याबाबत आपण मागे पण टेक्निसियनला बोलावले होते म्हणजेच त्यापेक्षा तिथून आर.ओ.बी. घ्यायला सुझाव दिलेला आहे. लोकांच्या सोयीसाठी असेल तर आपण इलेक्ट्रीकच्या लिफ्टसारख्या एस्केलेटर बसवावे. त्याचा खर्च जास्त होणार नाही. लोकांना सबवेमधून जायला सरळ जाता येईल. पुल चढून जायला जर त्रास होत असेल तर त्याचे एस्केलेटर बसवावे. त्याची डिझाइन अशी करा की, खाली काही ऑफीसेस काढा, ते भाड्याने द्या म्हणजे पंधरा-सोळा कोटी यामध्ये खर्च होईल आणि तो दोन वर्षात पूर्ण होईल. आपण साडेसात वर्षे झाली आपला भुयारी सबवे करतो आहे. आणि खेदाची बाब आहे, यावर्षी मा. स्थायी समितीच्या अध्यक्षांना माहिती नाही की काय माहिती नाही? भाईंदर (पूर्व) सोडून कुठे राहायला गेले असतील तर मला माहिती नाही. गंमतीने बोलतो. मागे पण मी गंमतीनेच बोललो होतो. पण त्यांना गंमत समजत नाही त्याला मी तरी काय करणार, ही पण एक गंमत आहे. एस्केलेटर बाजुला केले तर पादचारी एस्केलेटरवरुन जाऊ शकतील. आपण टू वे करणार आहोत तसा आपला आर.ओ.बी. फोर वे आहे. इकडे आपल्याला फोर-वेची एवढी गरज नाही. गोरेगावला एक अशा प्रकारचा आरओबी आहे. दोन्ही बाजूने रेल्वेने पॅरेलल गेला आहे. आणि पुढच्या बाजूला जाऊन तो क्रॉस झालेला आहे. त्यामुळे तो सक्सेसफुल होईल. तसा मडगाव, गोव्याला सुध्दा त्याच टाईपचा ब्रिज आहे. मा. पिठासीन अधिकारी साहेब, कृपया यावर स्पष्टीकरण द्यावे. आत्ता मी जे प्रश्न उपस्थित केले त्याचे स्पष्टीकरण द्यावे.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, माझेपण दोन तीन मुद्दे आहेत, त्याचापण खुलासा केला तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, महापालिकेने ज्यावेळेला डीपीआर मा. महासभेपुढे मंजुरीसाठी ठेवला आणि डीपीआर हा स्टेट गव्हर्नमेंट आणि सेंट्रल गव्हर्नमेंटकडे पाठवला. त्यावेलेला ३३१ कोटी ४२ लाख रूपयांचेच होते. मंजुरीचा कालावधी आणि टेंडर काढण्याचा कालावधी यामध्ये डिफरन्स शेड्युल रेटमध्ये पडला त्यामुळे ४९१ कोटी ९८ लाख हा फरक पडला. त्या फरकासह मंजुर झाल्यानंतर आपण टेंडर अलग केले. त्या डीपीआर मध्ये ज्या कंडीशन होत्या की, सेंट्रल गव्हर्नमेंटकडून ३५ टक्के आणि स्टेट गव्हर्नमेंटरकडून १५ टक्के असे ५० टक्के अनुदान आणि ५० टक्के लोन हे प्रस्ताव ठेवतानाच मंजुरीसाठी ठेवला होता. त्यामुळे कर्ज घेण्यासाठी सेपरेट ठराव करण्याची आवश्यकता नव्हती. कारण त्यावेळेला त्यामध्ये आलेले होते. दुसरी महत्वाची बाब की, सर्व महाराष्ट्रामध्ये प्रश्न पडला आहे की, सगळ्यांचेच आहे. मग नाशिक असेल, ठाणे असेल, सगळीकडेच हा प्रॉब्लेम झालेला आहे की, सेंट्रल गव्हर्नमेंटने मंजुर केलेली डेट आणि आपण टेंडर अलॉट केलेली डेट यामध्ये जो डिफरन्स आहे, तो परत मागणी करावा. केंद्रशासनाच्या विचाराधीन आहे असा प्रस्ताव चालू आहे. त्याप्रमाणे महापालिकेनेसुध्दा १६० कोटीचा प्रस्ताव पाठवलेला आहे की, डिफरन्स पडलेला आहे, तो आम्हाला मिळावा. ते जरी मान्य झाले तरी आपल्याला त्याचा ५० टक्के मिळेल म्हणजे ८० कोटी मिळतील.

**प्रफुल्ल पाटील :-**

४९१ कोटीची फायनल मंजुरी घेतली असे तुम्ही म्हणता मग आपल्याला मनपाचा हिस्सा कितीचा येतो? ४९१ प्रमाणे किती येणार?

**मा. आयुक्त:-**

५० टक्के

**प्रफुल्ल पाटीलः-**

म्हणजे २२६?

**मा. आयुक्तः-**

२२६. तेवढेच त्या २२६ चे लोन केले. आपण अजून उचललेले नाही. आणि प्रत्येक हेडवर आपण १३ नंबर पेजवर साडेसात कोटी दाखवलेले आहेत आणि ४१ पेजवर १९ कोटी दाखवलेले आहेत. म्हणजे प्रत्येक स्किमचे परत फेडीचे दाखवलेले आहेत आणि ते कर्ज आपण उचलल्यानंतर परत फेडीचे डेट सुरु होणार आहेत. त्यामुळे आत्तापर्यंत आपण ज्या-ज्या संस्थेकडून कर्ज घेतलेले आहे, त्या-त्या संस्थेचा एक रुपया पण आपल्याकडे शिल्लक नाही आणि कर्जफेड परत करायची तरतूद आपण केलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

२२६ कोटीमध्ये आपल्याला कर्ज किती मिळाले?

**मा. आयुक्तः-**

२२६ कोटी मंजूर करुन ठेवलेले आहेत अजून उचललेले नाहीत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण एकही पैसा कर्ज उचललेला नाही.

**मा. आयुक्तः-**

उचललेला नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग होणारा खर्च आपल्या ....

**मा. आयुक्तः-**

जसजसे आपण काम करु तसतसे त्यांच्याकडे बिले पाठवणार, ते व्हेरिफिकेशनला येणार. आणि ते व्हेरिफिकेशन झाल्यानंतर ५० टक्के सेंट्रल आणि स्टेटचे अनुदान मिळाल्यानंतर ५० टक्के ते घालून देणार. दुसरा बी.एस.यु.पी. चा जो प्रश्न आपल्यापुढे होता. बी.एस.यु.पी. चे २७९ कोटीचे मंजूर केलेले त्यामध्ये १५ टक्के मंजूर करताना कमर्शिअल ॲक्ट महापालिकेला अलाऊड केलेला आहे. तर १५ टक्के लँन्डवरुन २५ टक्के तुम्ही कमर्शिअल करु शकता अशा सुचना आहेत. त्यामुळे महापालिकेवर तो बोजा पडू नये म्हणून आपण २५ टक्के कमर्शिअल करण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. ती ३-४ दिवसांमध्ये मिळण्याच शक्यता आहे. तसे मा. सचिवांशी बोलणे झालेले आहे. १५ टक्के ऑलरेडी कमर्शिअल करावे म्हणून मंजूरीमध्ये आहे. आम्ही २५ टक्के मागणी केलेली आहे. २५ टक्के मागणी जर मान्य झाली आणि ते कमर्शिअल आपण बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यासाठी काढले, त्यामधुन उपलब्ध होणारी जी रक्कम आहे ती रक्कम बी.एस.यु.पी. साठी वापरावी अशा केंद्र शासनाच्या सुचना आहेत. त्यामुळे यामध्ये काही घोळ होऊ नये म्हणून थोडीशी तरतूद करून ठेवलेली आहे. जर स्कीमप्रमाणे कमी-जास्त व्हायला लागले तर हे ॲप्रोप्रिएशन करता येईल. मात्र कमर्शिअल तत्वावर ते करावे असे सेंट्रल गव्हर्नमेंट आणि स्टेट गव्हर्नमेंटच्या सुचना आहेत. आणि २५ टक्के लँडला एकूण टोटल एरियाच्या २५ टक्के लँडमध्ये कमर्शिअल करण्यासाठी परवानगी दिल्यानंतर आपण मा. महासभेपुढे सादर करणार आहोत आणि मा. महासभेने मंजूरी दिल्यानंतर पुढील कार्यवाही करणार. त्यामध्ये आमचा अंदाज आहे ७० ते ८० किंवा १०० कोटीपर्यंत आपल्या महापालिकेला उत्पन्न मिळेल. आणि त्यामध्ये महापालिकेचा जो हिस्सा आहे तो आणि इतर कामे करता येतील असा अंदाज आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही आत्ता जेव्हा आर्थिक तरतूद केली, आपण कन्फर्म आहात कि, २५ टक्के आपल्याला कमर्शिअल वापराला देणार आहात. मग ठिक आहे आपण मनपाचा हिस्सा ३ कोटी केला तर उरले २७ कोटी तुम्ही दाखवा.

**मा. आयुक्तः-**

बी.एस.यु.पी. चे जे म्हाडाकडून परवानगी मिळायच्या आहेत, ती परवानगी मिळाल्यानंतर आपण अमाऊन्ट दाखवू शकलो असतो. अजून आपल्याला १५ टक्के ऑलरेडी सेंट्रल गव्हर्नमेंटने मंजूरी देतानाच केलेले आहे. परंतू अजूनही २५ टक्के चे पत्र न आल्यामुळे ते कमर्शिअल करुन आपल्याला इन्कम मिळेल हे दाखवलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मग जर १५ टक्के मिळणार असे कन्फर्मेशन आपल्याकडे आहे, तर १५ टक्के प्रमाणे आपण बी.ओ.टी. तत्वावर दिले, त्याचे इंकम किती होईल त्याची तरतूद आजच्या अंदाजपत्रकात करायला पाहिजे आपण अंदाजपत्रक कुठेतरी वेगळे करतो आणि प्रत्यक्षात वेगळे करतो.

**मा. आयुक्तः-**

१५ टक्के ची कमर्शिअल करु शकतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

जेव्हा तुमचे उर्वरीत १० टक्के येतील तेव्हा पुर्नविनियोजन करावे.

**मा. आयुक्तः-**

एमएमआर मध्ये निर्मल अभियानाखाली १५४ युनीट ३००० शीट एम.एम.आर. हे रिझनमधल्या युनीट संडासाचे मंजूर केले आहे. त्या हिशोबाप्रमाणे फक्त एकदाच मिळणारी रक्कम आहे. वर्षानुवर्षे मिळणारी ही योजना नाही. हगणदारी मुक्ती योजना, म्हणजे ज्या-ज्या एरियामध्ये लॅटरीन नाहीत त्या एरियामध्ये ही योजना घेण्याची आहे. त्यामुळे १५४ युनीट आणि ३००० शीट बांधकाम झाल्यानंतर ते अनुदान बंद होणार आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

म्हणजे अगोदरचे युनीट झाले आत्ता उरलेले एवढेच आहेत. त्याची कॉस्ट १५ कोटी रूपये आहे.

**मा. आयुक्त :-**

३२ करोड रक्कम महापालिकेकडे आलेली आहे. सहा करोड येणे बाकी आहे. म्हणज हे बजेट प्रोव्हीजन करताना जे १५ करोड दाखवलेले होते, त्याच्या अगोदर काही रक्कम आलेली आहे. त्यामुळे आत्ता फक्त त्यांच्याकडून सहा करोड येणे बाकी आहे आणि युनिट ३००० शीटस् चालू आहेत ते अपूर्णावस्थेत आणि फायनल बील करेपर्यंत तेवढीच रक्कम येणार. वरवर्षी मिळणारी नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही जे भुयारी गटार योजनेचे सांगितले आपण एमएमआरडीए कडून ५० टक्के लोनने घेणार आहोत. आत्तापर्यंत भुयारी गटार योजनेचे काम किती झाले? आणि आत्तापर्यंत महापालिका फंडातून ठेकेदाराला आपण किती रक्कम दिली? आपण अजून लोन उचललेले नाही. जो ५० टक्के आपला वाटा आहे त्यामध्ये या ठेकेदाराला आपण किती पेमेंट दिले? आणि ते कुठल्या फंडातून दिले?

**मा. आयुक्त :-**

गव्हर्नमेंटचे ४१ ग्रँटेनरने मिळालेले होते आणि टेंडर कंडीशनप्रमाणे ॲडव्हान्स देणे होते. आणि त्या महापालिकेने १४ घातलेले आहेत. म्हणजे महापालिकेचा हिस्सा म्हणून. अजूनही लोन उचललेले नाही.

**प्रकाश दुबोले :-**

महापालिकेने किती १४ लाख?

**मा. आयुक्त :-**

१४ कोटी आणि ४०.

**प्रकाश दुबोले :-**

म्हणजे त्याला एकूण ५४ कोटी रूपये पोहोचले. त्यापैकी काम किती कोटीचे झाले?

**मा. आयुक्त :-**

२७ कोटीचे काम झालेले आहे.

**प्रकाश दुबोले :-**

आपण ॲडवान्स देऊन किती महिने झाले आणि कामाला सुरुवात कधी झाली?

**मा. आयुक्त :-**

आपण ॲडव्हान्स व्याज चालू आहे. व्याजासह रक्कम रिकव्हर होणार आहे.

**प्रकाश दुबोले :-**

ॲग्रीमेंटमध्ये तशी तरतुद आहे का?

**मा. आयुक्त :-**

टेंडर काढतानाच ती कंडीशन होते. जे ॲडव्हान्स देऊ आणि जेवढे दिवस ते का काम करू रिक्रुप करणार नाहीत, तेवढे दिवस इंटरेस्ट लावू.

**प्रकाश दुबोल :-**

मग साहेब, ॲग्रीमेंटमध्ये अर्शी किती दिवस अगोदर ॲडव्हान्स देण्याची तरतुद होती?

**मा. आयुक्त :-**

टेंडर मंजुर झाल्यानंतर दहा टक्के.

**प्रकाश दुबोले :-**

फक्त याच टेंडरला आपण ॲडव्हान्स द्यायची तरतुद केली आहे.

**मा. आयुक्त :-**

सर्व महाराष्ट्रामधील बीएसयुपी आणि जे.एन.एन.यु.आर.एम. मध्ये तशी तरतुद प्रत्येक ठिकाणी केलेली अहो. इथेच केली असे नाही.

**प्रकाश दुबोले :-**

पण साहेब, दहा टक्के पेक्षा जास्त रक्कम त्यांना पोहोचलेली आहे. आपण जर ४९१ कोटी म्हणतो त्यावेळेला १० टक्के पेक्षा....

**मा. आयुक्त :-**

दहा टक्के दिलेली आहे.

**प्रकाश दुबोले :-**

दहा टक्के पेक्षा जास्त रक्कम होते. ५४ कोटी त्याला पोहोचले ४९१ कोटीची स्किम आहे. किती होतात?

**दिपक खांबित :-**

कामाचे पण पाच कोटी दिले.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, ॲडव्हान्स आपण कामासाठीच दिला आहे. त्याने २७ कोटीचेच काम केले आहे. अजून ॲडव्हान्स घेतला तेवढ्या रक्कमेचे काम झाले तर त्याला कामाचे पैसे द्यायचे ना?

**दिपक खांबीत :-**

त्याच्याकडून आपण १५ कोटी कापले. त्याला जे ४९ कोटी ॲडव्हान्स दिले आहेत, त्यातून १५ कोटी आपण कापले.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, आत्ता तुम्ही सांगितले की, आपण त्याला ५४ कोटी रूपये दिले. १४ कोटी आपले आणि ४० कोटी शासनाने दिले होते. आणि त्याने २७ कोटीचे काम केले. आपण कामासाठी ॲडव्हान्स देतो.

**दिपक खांबित :-**

त्याला वर्क ऑर्डर दिल्यानंतर बारा हप्त्यामध्ये ती रक्कम कापायची आहे. त्याप्रमाणे आपण त्याच्याकडून जे २७ कोटी रूपयांचे बील झाले त्याच्यामध्ये त्याला फक्त पाचच दिले. बाकीचे सगळे पैसे आपण कापून घेतले.

**प्रकाश दुबोले :-**

साहेब, दहा टक्के देत असताना ऑलरेडी आपणच त्याला जास्त ॲडव्हान्स दिला आहे. आणि फक्त २७ कोटीचे काम झाले आहे.

**दिपक खांबीत :-**

४९१ ते १० टक्के फक्त ४९ दिले आहेत.

**धुव्रकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, एक खुलासा करा. हे २००९-२०१० चे सुधारीत अंदाजपत्रक आहे. आणि आत्ता २०१०-२०११ च्या अंदाजपत्रकाला आपण मान्यता देतो आहे. याच्यामध्ये २००९-२०१० चा बॅकलॉग किती आहे? आणि किती बॅकलॉग येणार आहे?याचा खुलासा करा. साहेब, बांधकाम, आरोग्य, पाणी आणि इतर कोणत्या खात्याचे पैसे आपल्याला द्यायचे बाकी आहेत? हे २००९-२०१० चे अंदाजपत्रक आहे. या अंदाजपत्रकामधून आपण या वर्षाचा किती बॅकलॉग सन २०१०-२०११ मध्ये टाकणार आहोत. म्हणजे एक्झाम्पल घ्या, पाणी डिपार्टमेंट, बांधकाम डिपार्टमेंट, आरोग्य डिपार्टमेंट अशा कीती डिपार्टमेंटची बीले आपण यावर्षी देणार आहोत. नाहीतर असे व्हायचे की, आपण हे २०१०-२०११ चे बजेट मंजुर करतो आणि बजेटच नाही. म्हणजे मागच्या वर्षाची बीले यावर्षी दिलेली आहेत. असे आहे का ते विचारून घ्या.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, सालाबादाप्रमाणे ३१ मार्च रोजी जी बीले पेमेंट करायची होती ती एप्रिलमध्ये खर्ची पडतात. ती १० कोटी शिल्लक आहेत.

**धुव्रकिशोर पाटील :-**

म्हणजे आपला १० करोडचा बॅकलॉग यावर्षी आहे? पण तो कोणत्या डिपार्टमेंटचा आहे? वॉटर, बांधकाम....

**मा. आयुक्तः-**

तो तुम्हाला सगळे माहिती आहे.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

साहेब, विषय असा आहे की, असे व्हायला नाही पाहिजे की, यावर्षी गटारामध्ये निधीच नाही.

**मा. आयुक्तः-**

सर्वसाधारणपणे पाणी पुरवठा, बांधकाम आणि आरोग्यामध्येच असणार. दुसरे कोणाचे असणार?

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

साहेब, बांधकामामध्ये यावर्षी गटाराला फक्त दोन करोड दिलेले आहेत. रस्त्याला आठ करोड दिलेले आहेत आणि मग जर तेवढी बिले आली आणि यावर्षी बजेट नसेल तर कामच होणार नाही.

**मा. आयुक्तः-**

मा. स्थायी समितीमध्ये सभासदांचे म्हणणे होते कि, दरवर्षी गटार कुठे बांधायचे आहे? नविन ठिकाणी बांधकाम करतात तिथे त्या बिल्डरने बांधायला पाहिजे. जास्त खर्च न करता मोठी स्किम करुन नागरीकांना सुविधा दया असे सभासदांचे मत होते. त्याप्रमाणे आपण कमी केले.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

यावर्षी आपल्याला किती बजेट मिळणार आहे ते तुम्ही सांगा

**मा. आयुक्तः-**

तुमच्याकडे आम्ही अजेंडयाचा दिवस आणि मिटींगचा दिवस सोडून सात दिवस दिले होते.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

साहेब, आम्हाला नाही स्टँडीगला.

**मा. आयुक्तः-**

तुम्हाला बजेट वाचायला तर सरप्लस किती राहतात?

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

पण सरप्लस नाहीत.

**मा. आयुक्तः-**

आम्ही तुम्हाला बजेट सात दिवस अगोदर दिले होते. कमी राहतात की जास्त राहतात तसा प्रश्न तुम्ही विचारा. तुम्ही आम्हाला बजेटचे सगळे विचारायला लागले. तुमच्याकडे आम्ही अभ्यासाकरिता दिले होते.

**ध्रुवकिशोर पाटीलः-**

साहेब, अभ्यास केला. यावर्षी बजेटच नाही.

**मा. आयुक्तः-**

बजेट का नाही ते आपण म्हणा.

**ओमप्रकाश अग्रवालः-**

मा. महापौर साहेब, ठराव मांडत असतील तर आमची काही हरकत नाही. पण त्या दोन्ही ठरावावर विस्तृत चर्चा करायला मोका द्या. आमचा या बजेटवर ठराव आहे. आमचा पण ठराव वाचून दोन्ही ठरावावर व्यवस्थित चर्चा होऊ द्या.

**भगवती शर्माः-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरणपत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे रक्कम रु. ११ लक्ष शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे. शासनाकडील मिळणारे अनुदान पाच वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने मिळत होते ते बंद झाल्याने त्यानंतर मनपा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मनपा स्वयंपूर्ण व्हावी यास्तव कर/दर वाढ करण्यात आल्याने वाढीव कर/दराचे उत्पन्नास शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

**सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक** **आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

**एस.ए. खानः-**

मेरा अनुमोदन है ।

**उमा पाटीलः-**

मा. आयुक्त साहेब, महानगरपालिका दर व कर सर्वसाधारण कर, मालमत्ता कर, सन २००८-०९, उत्पन्न ३५८५.३८ लाख, सन २००९-१० उत्पन्न ५२१० लाख, सन २०१०-११, उत्पन्न मा. आयुक्तांचे अंदाजपत्रक ४०७० लाख. मा. स्थायी समितीचे अंदाजपत्रक -५४०० लाख, सुमारे रुपये १४०० लाख तफावत मा. स्थायी समितीने स्पष्टीकरण दयावे. तसेच मोकळया जागेवरील कर, सन २००९-१० तरतुद व १०००० लाख पण प्रत्यक्षात वसुली निरंक. यावर्षात कर आकारणी केली आहे काय? असल्यास किती रक्कमेची सन २०१०-११ मा. आयुक्तांचा व मा. स्थायी समितीचा अंदाज रुपये ४०० लाख रुपये ४०० लाखात कमी तरतुद का? स्पष्टीकरण द्या. या वर्षात कर आकारणी केली आहे काय? असल्यास, किती रक्कमेची?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आत्ता ताईंनी विचारले, मागच्या आपल्या मुळ अंदाजपत्रकात सन २००१-१० मध्ये आपण ५२ करोड रूपये मालमत्ता कर दाखवला होता. आत्ता याच्यामध्ये आपल्या अंदाजामध्ये ४० करोड दाखवले आणि स्टॅंडींगने ५४ करोड दाखवला. मला कर विभागाला असे विचारायचे आहे की, आत्ता या नवीन वर्षामध्ये, सन २००९-१० मध्ये काही बिल्डींगना नवीन कर आकारणी झाली आहे की नाही? याची पण सविस्तर माहिती मला द्या आणि किती इमारतींना शास्ती लागलेली आहे त्याची पण संपूर्ण माहिती द्या.

**कल्पना म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, कर विभागामध्ये रिव्हेन्यु स्टॅम्प खरेदी सन २००८-०९ मध्ये पाच हजार होते आत्ता २००९-१० मध्ये डायरेक्ट पाच लाख दाखवले.

**प्रेमनाथ पाटील :-**

आत्ता आपण दोनदा नोटीसा काढलेल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, पहिल्या विषयावर आमचा ठराव आहे.

**भगवती शर्मा :-**

माझ्या दोन सुचना आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सन २००९-२०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील १) प्रभाग समिती निधी, २) नविन फायर फायटर खरेदी, ३) संगणक प्रणाली / नेटवर्कींग सुरु करणे, संगणक हार्डवेअर्स साहित्य खरेदी व इतर आवश्यक कामे, ४) कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग तसेच JNNURM लेखाशिर्षाखाली जमा असलेली रक्कम ३१ मार्च २०१० रोजी खर्च न पडणारी रक्कम, १) नविन रस्ते बांधकाम २) नविन गटारे / नाले बांधकाम, ३) डी.पी. रोड बांधकाम, ४) रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा, ५) इंडस्ट्रीयल मधील रस्ते / गटारे सुधारणा, ६) सर्व धर्मीय उत्सव या लेखाशिर्षाखाली वर्ग करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०१० पूर्वी प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षाखाली केलेल्या तरतुदीनुसार वार्षिक दराची विभागवार निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**मिलन पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**एस्.ए.खान :-**

मी सुचना मांडतो दि. ३१/०३/२०१० रोजी होणाऱ्या अर्थसंकल्पीय मा. महासभेमध्ये मी अशा सुचना मांडतो की, मिरा भाईंदर महानगरपालिका सन २५००७-०८ ते २००९-१० या वर्षात पालिका हद्दीतील सृष्टी कॉम्प्लेक्स, शांती नगर, जेसल पार्क, या वसाहतीतील रहिवाशांना चुकीच्या पध्दतीने लावण्यात येणारा विशेष स्वच्छता कर १३ टक्के ऐवजी.....

(सभागृहात गोंधळ)

**विजय पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. अनधिकृत बांधकामावर ५२ लाख रूपये शास्ती आहे.

**प्रेमनाथ पाटील :- :-**

आणि आत्ता ज्या नवीन इमारती झाल्या त्यांना आपण किती कर आकारणी......

**विजय पाटील :-**

चालू वर्षी आम्ही घरपट्टीच्या ज्या आकारणी केल्या त्या जवळ-जवळ पाच कोटी पंधरा लाखापर्यंत केलेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागे आपण २००९-१० ला बावन्न करोड रूपये दिले होते, ते वाढायला पाहिजे की, कमी व्हायला पाहिजे.

**विजय पाटील :-**

गेल्या वर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये जे अंदाज दिले आहेत, ते मा. महासभेने दिलेले अंदाज आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुमचे म्हणणे बरोबर आहे. पण २००७-०८ ला आपण ३६ करोड १३ लाख रूपये जमा केले. २००८-०९ इमारती झाल्याच नाही? उलट इमारती कमी झाल्या का? आपण फक्त ३५ करोडच जमा केले. मग आपला हा डिफरन्स जास्त व्हायला पाहिजे तो याच्यामध्ये कमी झाला. आपण याच्यामध्ये कमी पैसे वसुल केले.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, यापूर्वी ज्यावेळेला आपण अंदाजपत्रक बनवत होतो. त्यावेळेला वसुलीवर रक्कम दाखवत होतो. वसुलीवर रक्कम दाखवणे हे संयुक्तिक नाही. जर आपल्या नागरिकांकडून जेवढं डिमांड आहे, तेवढी रक्कम बजेटला असायला पाहिजे. यावर्षी धरलेली आहे. त्यामुळे पूर्वी जे वसुलीच्या आकड्यावर धरत होते, ते चुकीचे होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

पण यावर्षी इमारती झाल्या नाही की, आपण कर आकारणी केली नाही?

**मा. आयुक्त :-**

यावर्षी ५४ करोड रूपये दाखवलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे ४० करोडचे होते.

**मा. आयुक्त :-**

ज्यावेळेला करवाढीचा विषय मा. महासभेपुढे येऊन निर्णय होणार होता. तो निर्णय मा. स्थायी समितीने घेतल्यामउळे ४० करोडचे ५४ कोटी रूपये दाखवले.

**प्रेमनाथ पाटील :-**

उरलेल्या ४ महिन्यामध्ये आपले ३१ करोड रूपये वसुल होतील का?

**मा. आयुक्त :-**

हा वसुलीचा आकडा आहे. आणि हा बजेटचा आकडा ५४ कोटीचा आहे. ५४ कोटी म्हणजे ४७ वरुन ५४. म्हणजे ०७ कोटी वाढीव धरलेले आहेत.

**उमा पाटील:-**

विशेष शिक्षण कर, सन २००९-१०, तरतुद १८५ लाख कोटी मा. आयुक्त साहेब ....

**विजय पाटील:-**

हा अंदाज घेतलेला आहे.

**जयंत पाटील:-**

मा. महापौर साहेब, श्री. प्रफुल्ल पाटील बोलतात ते बरोबर आहे. तुम्ही पेजवाईज चला. प्रत्येकाचे योग्य त्या सुचना असू शकतात. त्या सुचनांचा विचार आपल्याला करावाच लागेल. त्याच्यामुळे पेजवाईस चला. जसा त्यांचा रिव्हेन्यू स्टॅम्पचा आहे. एक एक विषय येईल. त्याप्रमाणे चला आणि त्याप्रमाणे सुधारणा करत चला. मा. स्थायी समितीचे अंदाज आणि मा. आयूक्तांचे अंदाज यांच्यात काही ठिकाणी खूप तफावत आहे. चर्चेमध्ये तूम्ही त्याचे उत्तर देऊ शकतात.

**उमा पाटील :-**

मोकळया जागेवरील कर, सन २००९-१०, तरतूद १००० लाख, प्रत्यक्षात वसुली निरंक.

**ओमप्रकाश अग्रवाल:-**

मा. महापौर साहेब, आमचा ठराव वाचून घ्या. मग पानवाईज चर्चा करा.

**उमा पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, मी मोकळया जागेवरील कर आकारणी बद्दल विचारले आहे त्याची तरतूद काय केली आहे याचे मला स्पष्टीकरण द्या. कारण २००९-१० ची ....

**मा. आयुक्त:-**

मोकळया जागेची कर आकारणी चार कोटी केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांचा प्रश्न असा आहे की, सन २००९-१० ला आपली वसूली का झाली नाही?

**मा. आयुक्त:-**

वसुली झाली.

**विजय पाटील:-**

सन्मा. सदस्या, आपली मोकळया जागेवरची कर आकारणी ६५ लाख रुपये झालेली आहे.

**उमा पाटील :-**

इथे निरंक दाखवले आहे.

**विजय पाटील:-**

सी.सी. दिल्यापासून भोगवटा दाखल्यापर्यंतचा जो पिरीएड असतो त्याच्यासाठीच मोकळया जागेवरची कर आकारणी आपण करत असतो.

**प्रफुल्ल पाटील:-**

विषयाची गल्लत आणि गफलत करु नका. एक विषय मा. महासभेपूढे आणला. असे विषय जेव्हा तुम्हाला पाहिजे असतात तेव्हा मा. महासभेने काहीही ठराव करून दयायचे. मा. महासभेने ठराव करून दिला की, तुम्ही कुलुप बंद करता, त्याच्यावर काही करत नाही. गेल्या सहा-आठ महिन्यापूर्वी या महासभेने, त्यावेळेला कर अधिक्षक श्री. अजित पाटील होते, त्यावेळेला मा. महासभेने असा ठराव करुन दिला होता की, ज्या बिल्डरांनी सी.सी. घेतलेली आहे पण वर्षानूवर्षे ते बांधकाम करत नाहीत, ओ.सी. घ्यायला येत नाहीत कारण बांधकाम केलेच नाही तर ओ.सी. घ्यायला येत नाहीत. दुसरी गोष्ट, सी.सी घेतलेली आहे, बांधकाम केलेले आहे पण ओ.सी. घेतलेली नाही. अशा बिल्डरांचे सर्व प्रस्ताव टाऊन प्लॅनिंगने टॅक्स डिपार्टमेंटला पाठवायचे आणि टॅक्स डिपार्टमेंटने त्याच्यावर टॅक्स लावयचा. हा मोकळया जागेवरचा कर नाही.

**मा. आयुक्त :-**

कलेक्टर साहेबांनी एन.ए. केल्यापासून ते बांधकाम प्रत्यक्ष सुरु केले तर बंद होणार. बांधकाम सुरु केलेच नाही तर एन.ए. झाल्यापासून बांधकाम करेपर्यंत टॅक्स चालू राहणार. ते ५२ लाख रूपये आपण पाच-सहा महिन्यात वसुल केलेले आहेत.

**प्रफुल्ल पाटीलः-**

मोकळया जागे वरचा कर वेगळा आहे. हा प्रस्तावित बिल्डींग, जसे तुम्ही सी.सी. देता. त्यांना अमुक वर्षाची मुदत देता ना?

**मा. आयुक्तः-**

काम सूरू करायला एक वर्ष.

**प्रफुल्ल पाटीलः-**

एका वर्षात त्यांनी बिल्डींग बांधली नाही तर त्या बिल्डींगच्या फ्लॅटच्या एरीया प्रमाणे तो टॅक्स लागतो. याच्यासाठी मागे ठराव दिला होता. आत्ता नगररचना विभागाने आम्हाला ही माहिती द्या की, असे किती प्रस्ताव तुम्ही टॅक्स डिपार्टमेंटला दिले? कारण टॅक्स डिपार्टमेंटची अशी बोंबाबोंब होती की, तुम्ही फालतूमध्ये ठराव केलेला आहे. पण नगररचना विभाग दखल घेत नाही. आणि आम्हाला अशी कुठलीही प्रकरणे पाठवत नाही. आपल्याकडे अशी शेकडो प्रकरणे असतील की, सी.सी. दिलेली आहे. ओसी. घ्यायला बिल्डर आलेला नाही. एखादाच बिल्डर टॅक्स लावून घ्यायला येतो.

**मिलन पाटीलः-**

साहेब, तुम्ही त्यावेळेलापण सांगितले होते की, सी.सी. दिल्यानंतर त्याने काम चालू केले नाही तर त्याला टॅक्स लावायचा एन.ए. पासून नाही.

**मा. आयुक्तः-**

एन.ए. च्या तारखेपासून ते काम सूरू करेपर्यंत.

**मिलन पाटीलः-**

एन.ए. च्या तारखेपासून सहा महिने फाईल तुमच्याकडे पडून असतात. तुम्ही देत नाही. तो बिल्डर सहा महिन्याचा टॅक्स भरेल.

**मा. आयुक्तः-**

तुम्ही पूर्तता करायला पाहिजे एन.ए. झाल्यानंतर कोणी अर्जच केला नाही तर त्याच्याकडे आम्ही मागायचे.

**मिलन पाटीलः-**

देताना तुम्ही एका खुर्चीमध्ये देत नाही की, एवढया पेपरची पूर्तता करून आण. तुम्ही एक पेपर दिला की, परत दुसऱ्या पेपरचे सांगता. त्याला सहा महिने निघून जातात. मग त्या बिल्डरने सहा महिने तुमचा टॅक्स भरत राहायचा?

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर साहेब, इथे जमिनीचे पाहिले तर एकच जमीन १०-१५ जणांना विकलेली आहे. त्यामुळे सगळे व्हेरिफिकेशन करूनच द्यावे लागते.

**मिलन पाटील :-**

सी.सी. नंतर त्यांनी काम चालू केले नाही तर आम्ही टॅक्स लावणार. आज तुम्ही बोलता की, एनए आणल्यानंतर फाईलला सहा महिने लागतात. मग त्या बिल्डरने काय करावे? सहा महिने टॅक्स भरत राहायचे?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही दुसरीकडे किती महिने लागतात ती चौकशी केली नाही.

**मिलन पाटील :-**

आम्हाला दुसऱ्यांचे मतलब नाही.

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे सर्व कागदपत्रांची पुर्तता झाल्यानंतर साठ दिवसात द्यायचे बंधनकारक आहे. साठ दिवसात दिले नाही तर तुम्ही नोटीस द्या की, आमची परवानगी बरोबर आहे. आम्ही काम सूरू करतो.

**मिलन पाटील :-**

तुमचा स्टाफ आणि तुम्ही हुशार आहात. तुम्ही ताबडतोब त्याचे नोटींग करून देता की, या कागदाची पुर्तता करा. त्याला सहा महिने काय दोन महिने लागतच नाहीत. तुम्ही काहीच उत्तर दिले नाही तर तुम्ही उत्तर देऊन मोकळे होता. फाईल घेऊन ठेवता.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण आधी फाईल ठेवून देता.

**मिलन पाटील :-**

अशी सहा महिन्यांची कितीतरी प्रकरणे आहेत.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण एकतर विषयावर येऊ. मगाशी सन्मा. नगरसेविका श्रीम, उमा पाटील यांनी असा विषय मांडला की, २००९-१० चे तुमचे मालमत्ता कराचे उत्पन्न ५२.१० कोटी आहे. यावर्षी तुम्ही फक्त ५४ कोटीचीच वाढ दाखवली आहे. आत्ता मालमत्ता करात आपण डबल वाढ करतो आहे. तुम्हाला प्रपोज बिले बघा. कशी असतील त्याची कॉपी देऊ का? ही प्रपोज बिले बघा. आज जर तुम्ही करवाढीला म्हणजे मालमत्ता करवाढीला जर मंजुरी दिली तर ज्याला ४४९० रूपये टॅक्स येणार आहे, त्याला ६६२० रूपये टॅक्स भरावा लागणार आहे. तुम्ही आत्ता बजेटमध्ये जे हाऊस टॅक्स वाढविण्याबाबत दिले आहे, त्या हाऊस टॅक्सच्या तुमच्या रेटप्रमाणे वाढविण्याबाबत दिले आहे, त्या हाऊस टॅक्सच्या तुमच्या रेटप्रमाणे गेले तर ६६२० इतके, म्हणजे जे जुने फ्लॅटधारक आहेत, त्यांना जवळ जवळ ९० टक्के जास्त टॅक्स भरावा लागणार आहे. आणि जे नवीन येणार आहेत त्यांना तिप्पट भरावे लागणार आहेत. म्हणजे ९८३५.

**मिलन पाटील :-**

त्याच्यावर भाडेतत्वावर पण आहे. भाडेतत्वाची पण यांनी केलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

१.६० प्रमाणे आणि २.०० रूपयांप्रमाणे. असे असताना तुम्ही दोन कोटींचीच वाढ कशी दाखवली ? जेव्हा जुन्या मालमत्ता करधारकाला अशा पध्दतीने मालमत्ता करामध्ये वाढ होणार असेल तर दोनच कोटी तुमची वाढ कशी आली? प्रॉपर्टीचे तुम्ही २८ टक्के चे ३० टक्के केले. मग ३० टक्के नुसार बाकी सगळे कर वाढलेच ना?

**मा. आयुक्त :-**

जुन्या रेटेबल व्हॅल्युवरच असणार ना?

**प्रफुल्ल पाटील :-**

जुन्या रेटेबल व्हॅल्युवर असले तरी पूर्वी आमचे सिलींगवर २८ टक्के होते. सिलींग उठून आम्ही ३० टक्के केले. आत्ता हे ३० टक्के केल्यानतर तुमचा सर्वसाधारण जो जुना फ्लॅटधारक आहे त्याला जवळ जवळ ५० टक्के पेक्षा जास्त करवाढ होते.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, श्री. प्रफुल्ल पाटील साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला, २ टक्के मिनिमम आणि मॅक्झीमम १० टक्के आपण वाढवतो. म्हणजे एखाद्या वॉर्डचे आपण एव्हरेज काढले तर तो ५ टक्के आहे. आत्ता जे २८ टक्के आहे ते ३३ टक्के तुम्ही गोळा करणार आहे. ३० टक्के ने करू नका. त्याच्यात एव्हरेज ५ टक्के ने वाढ होणार आहे. मग ती कमीत कमी ५ टक्के रक्कम वाढली पाहिजे. तुम्ही २ टक्के वाढ करू नका. आजची रेटेबल व्हॅल्यु किती आहे?

**विजय पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सन २००९-१० ची फक्त घरपट्टीची जी आपली डिमांड आहे, ती ४६ कोटी रूपये आहे. आणि आत्ता अंदाजपत्रकाध्ये ५४ कोटी रूपये दाखवलेली आहे.

**मा. आयुक्तः-**

मा. महासभेने ठरवले होते की, बिल्डींग वाढतील. मग ते इन्कम धरण्यासाठी सुचवले होते. आपले जे डिमांड आहे ते ४६ कोटी आहे आणि आत्ता वाढीव सह आपण ५४ दाखवले आहे. ४६ आणि ५४, आठ कोटी वीस लाखाचे काहीतरी जाते.

**प्रफुल्ल पाटीलः-**

तुम्ही म्हणता ४६ कोटीचे डिमांड आहे. मग आपण आपल्या अंदाजपत्रकात ४० कोटीचे का दिले?

**विजय पाटीलः-**

यापूर्वी आपण जे ॲक्च्युअली डिमांड असायचे त्याच्या ८० टक्के वसुली धरुन ते डिमांड दाखवायचो. आत्ता आपण टोटल अमाऊंट दाखवतो.

**प्रफुल्ल पाटीलः-**

मागच्या वर्षाची सुध्दा शिल्लक तुम्ही याच्यात पकडली असे तुम्हाला म्हणायचे आहे?

**मा. आयुक्तः-**

साहेब, मागच्या वेळेला बजेट करणाऱ्यांनी असे केले की, आपण पब्लीक कडून येणे ४६ आहे, परंतू वसुली किती होती तेवढी दाखवली. वास्तविक डिमांड असेल ते आपले असेट आहे. म्हणजे त्यांच्याकडून वसूली होऊ दे नाहीतर न होऊ दे. परंतू आपले येणे ४६ असताना वसुली किती होणार तेवढीच रक्कम दाखवली ती चुकीची असल्यामुळे ४६ दाखवायला पाहिजे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

साहेब, आपण याच्यामध्ये या फिगरचे सेग्रीगेंशन करावे, म्हणजे असे वेगळे करा की, आकारणी किती? म्हणजे वर्षाची मुळ आकारणी कीती, तर ४२ कोटी. मागील बाकी ४ कोटी. असे करुन ४६ कोटी यावर्षाची तरतुद ठेवलेली आहे.

**मा. आयुक्तः-**

आपली ओरीजनल डिमांड आणि वाढीव धरुन एकुण ५४ कोटी म्हणजे ४६ आणि ५४ अशी आठ कोटीची वाढ दाखवलेली आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

दुसरा, मोकळया जागेवरचा जो टॅक्स आहे त्याची व्याख्या आपण गल्लत करतो. एकतर आपला जो एन ए झालेला पोरषण आहे, त्याच्यानंतर आपण जेवढी बिल्डिंग बांधतो आणि जी मार्जिन जागा सुटते, त्या मोकळया जागेवर टॅक्स लागतो.आणि तुम्ही जे म्हणता तो आम्ही सी.सी. दिला, कारण तुमचा एन.ए. अगोदर येतो, एन.ए. दिल्यानंतर सी.सी. येते. सी.सी. नंतर त्याने एका वर्षात, तुम्ही सी.सी. मध्ये अट टाकता की, एका वर्षामध्ये त्याने बिल्डींग बांधायची. एका वर्षात त्याने बिल्डींग बांधली नाही तर आम्ही टॅक्ससाठी का थांबायचे? एका वर्षानंतर त्याच्या फ्लॅटचा जो एरीया आहे त्याप्रमाणे आम्ही बिल्डरला टॅक्स लावणार. हा मोकळया जागेवरचा कर होत नाही.

**मा. आयुक्तः-**

साहेब, जरा दुरुस्ती करावी लागेल. आपण सी.सी. दिल्यानंतर त्याने कामाला सुरु केले नाही तर हा टॅक्स सुरु करा. जरा त्याने कामाला सुरुवात केली तर ......

**प्रफुल्ल पाटीलः-**

पण तुम्ही सी.सी. ची मुदत एका वर्षाची देता ना?

**मा. आयुक्तः-**

एका वर्षाची आपण देतो. परंतू काम सुरु करेपर्यंत, समजा सी.सी. नेतात आणि बिझनेस करतात. हे त्या पाठीमागचे धोरण आहे. त्याने जर काम सुरु केले तर तो टॅक्स बंद करायचा.

**प्रफुल्ल पाटीलः-**

सी.सी. मध्ये आपण मुदत देतो की नाही?

**मा. आयुक्तः-**

एका वर्षाची

**प्रफुल्ल पाटीलः-**

मग एका वर्षानंतर तुम्ही त्यांना टॅक्स लावायलाच पाहिजे.

**मा. आयुक्तः-**

कमेन्समेंट म्हणजे आपण काम सुरु करण्याचे आदेश देतो. काम करणे सुरु केले तर तो टॅक्स थांबायला पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

साहेब, आत्ता पण तुमची चुकी आहे.

**मा. आयुक्तः-**

म्हणजे काम कम्प्लीट होईपर्यंत टॅक्स चालू ठेवायचा?

**भगवती शर्मा :-**

श्री. प्रफुल्ल पाटील साहेब सांगतात एका वर्षासाठी...

**मा. आयुक्तः-**

एका वर्षासाठी काम सुरु करायचे सी.सी मध्ये बंधनकारक आहे.

**जयंत पाटीलः-**

साहेब, आपण एका गोष्टीचा विचार करत नाही, इमारत विकासक. आत्ता मध्ये रेतीच्या अडचणी आल्या. आपण फक्त मुदत देतो. पण या अडचणींचा आपण कधीही विचार करत नाही. कधी-कधी आपण सी.सी. दिली, पण प्लान रिवाइजलाही जातो. जो रिवाइजचा दोन-तीन महिन्याचा कालावधी असतो, तोसुध्दा आपण पकडत नाही. तुम्ही म्हणता की, आम्ही एन.ए. दिल्यापासुन स्टार्ट करतो. ॲक्च्युअल काम कधी स्टार्ट होते त्याचा विचार आपण करायला पाहीजे. आणि येणाऱ्या अडचणींचाही विचार आपण करावा.

**प्रफुल्ल पाटीलः-**

या ठिकाणी प्रश्न असा आहे की, तुम्ही सी.सी. देता तेव्हा बिल्डरला बांधकाम करायला दिले की नाही? आत्ता एखादा बिल्डर ते बांधकाम चालू करेल, नाही करणार म्हणून तुम्ही एका वर्षाची मुदत देता म्हणजे तुमच्या सी.सी. च्या अटीप्रमाणे त्याने एका वर्षात काम चालू करायला पाहिजे. एका वर्षानंतर तुम्ही तो टॅक्स लावायला पाहिजे. म्हणून याचा जो लेखाशिर्ष आहे हा मोकळया जागेवरील कर न करता प्रारंभ पत्र ते भोगवटा दाखल्यापर्यंतचा टॅक्स. आणि मग एकदा तो टॅक्स सुरु झाला आणि मग त्याने ओ.सी. घेतली, त्यानंतर तुमचा तो टॅक्स ऑटोमेटीक पुढे चालू राहतो. फक्त तो ज्यांनी फ्लॅट खरेदी केले आहेत त्यांना लागणार म्हणून त्या ठिकाणी सी.सी. दिल्यानंतर एका वर्षानंतर त्यांनी जर काम चालू केले नाही तर त्याला तुम्ही सी.सी टु ओ.सी. .......

**मर्लिन डिसाः-**

श्री. पाटील साहेब, या ज्या मोकळया जागा आहेत, ओपन स्पेसेस आहेत, त्यांना तुम्ही टॅक्स लावता ना?

**विजय पाटीलः-**

याच्यामध्ये रिव्हेन्यू स्टॅम्पसाठी जी पाच लाख रुपयांची खरेदी दाखवलेली आहे, ती सर्व विभागांची आहे.

**कल्पना म्हात्रेः-**

गेल्या वर्षी पाच हजार होती. पाच हजाराचे दहा हजार झाले, ठिक आहे.

**विजय पाटीलः-**

सर्व विभागांची आहे. त्यामध्ये घरपट्टी विभाग येतो, पाणी पुरवठा विभाग येतो, इतर आस्थापना, सामान्य प्रशासन येते. स्टाफचा पगार येतो.

**कल्पना म्हात्रेः-**

तुमचे उत्तर चुकीचे आहे हे पाच लाख नाहीत.

**रामनारायण दुबेः-**

कमिशनर साहब, कितना पट बढाया है? पाच हजार का पाच लाख?

**ओमप्रकाश अग्रवालः-**

साहेब, प्रिंटींग मिस्टेक झाली म्हणून सांगा.

**कल्पना म्हात्रेः-**

दोन रुपये एक स्टॅम्प येतो. पाच लाख म्हणजे तुम्ही अडीज लाख स्टॅंप मागवता का?

**मा. आयुक्तः-**

मा. महापौर साहेब, पाणी पुरवठा, प्रॉपटी टॅक्स आणि सर्व कर्मचाऱ्यांचे पेमेंट करताना प्रत्येक ठिकाणी रिव्हेन्यू स्टॅम्प लावावा लागतो.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्तः-**

आत्ता एकाच ठिकाणी दाखवलेले आहे.

**विजय पाटीलः-**

मॅडम याच्यामध्ये असे आहे की, जनगणनेचे काम चालू होणार आहे. त्याच्यासाठी प्रत्येक शिक्षकाला, प्रत्येक प्रगणकाला जे पेमेंट द्यावे लागणार आहे. आपण तीन हजार लोक नेमणार आहोत त्याच्यासाठी ही तरतूद थोडी जास्त ठेवलेली आहे.

**मा. आयुक्तः-**

सगळे हायस्कुल, सगळे प्रायमरी स्कुल आणि प्रायव्हेट सुध्दा शिक्षक घ्यायचे आहेत.

**मिलन पाटीलः-**

साहेब, माझी एक सुचना आहे. मालमत्ता करामध्ये भाडेतत्वावर आपण जी ३०-३२ परसेंट वाढ केलेली आहे, तेवढी वाढ न करता त्याला १६ टक्के करावे अशी मी सुचना करत आहे. आपण हे जे बजेट तयार करतो, दरवर्षी आपण बजेट तयार करतो. परंतू या अधिकाऱ्यांना आपण जे इष्टांक देतो, ते अधिकारी इष्टांक पूर्ण करत नाहीत. आणि त्यामुळे त्याचा परिणाम आपल्या बजेटवर होतो. बजेटवर परिणाम झाल्यामुळे आपले जे येणे असते ते रुकल्या कारणाने आपल्याला बाहेरून कर्ज घ्यावे लागते. हे अधिकारी कोणतेही काम करत नाहीत. दिलेला इष्टांक पूर्ण करत नाहीत आणि त्यामुळे आपल्याला, महापालिकेला नुकसान सोसावे लागते. आणि ते नुकसान म्हणजे आपण व्याज घेऊन आपल्याला पूर्ण करावे लागते.

**मा. महापौरः-**

तुम्ही बसून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौरः-**

श्री. भगवती शर्मा यांनी जो ठराव मांडला तो कायम करण्यात यावा.

**नरेंद्र मेहताः-**

कायम करता येणार नाही. आमचा दुसरा ठराव आहे.

**प्रभात पाटीलः-**

सुरुवात करण्याअगोदर पान वाईज चला. इकडे इतर सदस्य आहेत त्यांना काही कळत नाही. माझ्यासमोर विचारा.

**शशिकांत भोईरः-**

मा. महापौर साहेब, श्रीम. प्रभात पाटील मॅडमनी जी सुचना मांडली ती रास्त आहे. आणि त्याप्रमाणे पानाप्रमाणे चला.

**प्रभात पाटीलः-**

चर्चा कराल तेव्हा पानवाईज चला.

**कल्पना म्हात्रे :-**

वृध्दाश्रम कुठे-कुठे आहेत हे तुम्ही मला सांगा.

**मा. महापौरः-**

श्री. नरेंद्र मेहता ठराव वाचून घ्या.

**नरेंद्र मेहताः-**

सन २००९-१० च्या सुधारीत व २०१०-११ च्या मुळ अर्थसंकल्पावर चर्चा करुन अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतचा विषय सभागृहासमोर आला आहे.

स्थायी समितीसमोर अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा विषय दि. ११/०३/२०१० च्या सभेत ठेवण्यात आला असता अंदाजपत्रकात महानगरपालिकेने आकारावयाच्या विविध करात दरवाढ व नविन कर लागू करणेबाबत कोणताही विषय स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर नव्हता. तरीदेखील महानगरपालिका प्रशासनाने विविध करात दरवाढ करुन लगेच नविन कर प्रथमतःच आकारुन दरवाढीसह व तसेच १४८ कोटी रुपये M.M.R.D.A. कडून कर्ज घेण्याकरीता व भुयारी गटार योजनासाठी २५६ कोटी रुपयेचा प्रस्ताव महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारनी मंजुरी घेतली असताना ४९१ कोटी रुपये निविदेला मान्यता दिली. कर्ज घेण्यासाठी व तसेच भुयारी गटार योजनेच्या वाढीव रकमेची निविदा मंजूरीसाठी मा. महासभेची मान्यता आवश्यक होती. मा. महासभेने वरील दोन्ही प्रकरणासाठी कुठल्याही प्रकारची मान्यता दिलेली नसताना अर्थसंकल्प व अंदाजपत्रक महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवला आहे जो पूर्णतः बेकायदेशीर आहे.

महानगरपालिकेस कोणतीही दरवाढ करावयाची असल्यास त्यास फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेपूर्वी मान्यता घेण्यात यावी अशी तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ मध्ये आहे.

तथापी मनपा प्रशासनाने महानगरपालिका अधिनियमाचे उल्लंघन करुन बेकायदेशीरपणे दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा लोन व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल करुन अंदाजपत्रक व सुधारीत अर्थसंकल्प तयार केले आहे म्हणून आमचा या दरवाढीस व १४८ कोटी रुपयाचा लोन व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल केल्याबद्दल तीव्र विरोध व आक्षेप आहे.

प्रशासनाने केलेली बेकायदेशीर सर्व दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा M.M.R.D.A. चा लोन प्रस्ताव व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल वगळून भाजपा, शिवसेना व अपक्षच्या सदस्यांनी केलेल्या सुचना विचारात घेऊन त्यानुसार होणाऱ्या अंदाजपत्रकास व अर्थसंकल्पास आम्ही मान्यता देत आहोत.

तरी सन २००९-१० च्या सुधारीत व २०१०-११ च्या मुळ अर्थसंकल्पात प्रशासनाने केलेली सर्व दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा M.M.R.D.A. चा लोन प्रस्ताव व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल वगळून भाजपा, शिवसेना व अपक्षच्या सदस्यांच्या सुचना स्विकारुन अंदाजपत्रकास आम्ही मान्यता देत आहोत.

**प्रशांत पालांडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहताः-**

मा. आयुक्त साहेब, आत्ता जे मी सांगितले की, एखाद्या कुठल्याही प्रकारची दरवाढ करायची असेल तर ९९ प्रमाणे ती २० फेब्रुवारीच्या आत केली पाहिजे.

**मा. महापौरः-**

ठराव वाचून घ्या.

**जूबेर इनामदारः-**

ठराव वाचून झालेले आहेत. मतदानाला घ्या.

**प्रशांत पालांडेः-**

सचिव साहेब एक ठराव आहे.

**मा. महापौरः-**

तिसरा ठराव वाचून घ्या.

**प्रशांत पालांडेः-**

राज्य सरकारने १ एप्रिल २०१० पासून तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये स्थानिक संस्था कर लागू करण्यात आल्याचे जाहिर केले आहे. सन २००८ मध्ये राज्य शासनाने जकाती ऐवजी उपकर लागू केला होता. त्या काळात सुमारे साडेतीन महिन्याच्या कालावधीमध्ये महानगरपालिकेचे साडेबारा कोटी रूपये उपकरामुळे कमी प्राप्त झाले असून राज्य शासनाने महानगरपालिकेला झालेली नुकसान भरपाई अनुदान स्वरूपाने द्यावी अशी मागणी प्रशासनाने राज्य शासनाकडे केलेली आहे. १ एप्रिल २०१० पासून जकात ऐवजी स्थानिक संस्था कर प्रायोगिक तत्वावर लागू केल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेला जकातीच्या उत्पन्नाच्या सुमारे ५० टक्के पेक्षा जास्त जकातीच्या महसुली उत्पन्नात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण आज मंजुर करणाऱ्या २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पातील विकासकामावर करण्यात आलेल्या

तरतुदींवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. म्हणून मी खालील ठराव मा. महापौरांच्या संमतीने मांडत आहे व त्यास सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करीत आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव यांच्यापेक्षा वेगळा आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

होय वेगळा आहे.

**शरद पाटील :-**

यांच्यापेक्षा वेगळा आहे हे कोणी ऐकलेच नाही तर कसे माहिती पडेल.

**प्रविण पाटील :-**

भाजपची भुमिका वेगळी आहे आणि आमची भुमिका वेगळी आहे.

**मा. महापौर :-**

श्री. नरेंद्र मेहता यांनी ठराव वाचताना बीएसपी आणि शिवसेनेचे नाव घेतले म्हणून बोलतो.

(सभागृहात गोंधळ )

**प्रशांत पालांडे :-**

२००८ साली जकाती ऐवजी उपकर लागू केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान राज्य शासनाने संपूर्णपणे अनुदान स्वरूपात भरपाई करून द्यावी. १ एप्रिल २०१० पासून जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केल्यास महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाल्यास त्याची १०० टक्के भरपाई राज्यशासनाने करून द्यावी असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, मला एक सांगा, सभागृहामध्ये तीन ठराव होऊ शकतात का?

**मा. महापौर :-**

होऊ शकत नाहीत.

**भगवती शर्मा :-**

बजेट के सिवाय कोई ठराव होगा क्या? हा वेगळा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

वेगळा ठराव घेता येणार नाही. बजेटचा ठराव असेल तरच घेण्यात येईल.

**प्रशांत पालांडे :-**

हे बजेटच्या संबंधी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, मतदानाला घ्या.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, २००९-२०१० चे सुधारित अंदाजपत्रक आणि २०१०-२०११ चे अंदाजपत्रकाला आपण मान्यता दिलेली आहे. तत्पुर्वी काही गोष्टींचा खुलासा मला करायचा आहे. आणि मला प्रशासनाला हे विचारायचे आहे. प्रशासनाच्या काही चुका मला अंदाजपत्रकाच्या माध्यमातून आपल्यासमोर ठेवायच्या आहेत. मा. महापौर साहेब, आपण अर्थसंकल्पाच्या माध्यमातून बऱ्याचशा योजना नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये करत असतो. परंतु, त्या योजनांची पुर्तता झालेली दिसत नाही. मी आपल्याला उदाहरण देईन. मगाशी श्री. प्रफुल्ल पाटील यांनी बीएसयुपी योजनेचे आपल्याला सांगितले की, त्या योजनेमध्ये गोंधळ झाला. पूर्ण झाली नाही. तर ती योजनाच आपली बारगळली. मिरा भाईंदर महापालिकेत दोन अशी गटारे तुम्हाला दाखवतो की, ज्याचे बंदिस्त गटार करण्याचा प्रस्ताव आपण आणला. काही ठिकाणी ते बंदिस्त केले गेले. परंतु दोन वर्षानंतर पुढची कारवाई झाली नाही. पुढचे गटार उघडेच आहे. म्हणजे एका ठिकाणी आपण ते गटार बंदिस्त करतो. अर्थसंकल्पात तरतुद करतो. उदाहरणच द्याचे झाले तर गोडदेव नाक्यावरून एस.एन. कॉलेजच्या समोरून नवघर खाडीपर्यंत जाणारे गटार. ते मला वाटते श्री. प्रफुल्ल पाटील यांच्या ऑफीसच्या थोडे पुढे गेल, विमल डेअरी रोडपर्यंत, आणि पुढे ते मोकळेच आहे. तसेच एक गटार, न्यु गोल्डन नेस्ट या रस्त्यावर आहे. तेसुध्दा गोडदेव गावात जाणारा जो रस्ता आहे, या रस्त्यापर्यंतच झाले. परंतु, त्याच्या पुढचे गटार होऊ शकले नाही. त्याची कारणमिमांसा कारण काय हे आम्हाला कळलेले नाही. आपल्या अशा बऱ्याचशा योजना आहेत. आपण इकडे आणतो, मांडतो, करतो. परंतु त्या योजना पुर्णत्वास जात नाहीत. त्याचे पेमेंट झाले असेल. झाल्याशिवाय कसे होणार. बाकीचे अर्धवट गटार का पूर्ण होत नाही. ते पुर्णत्वास गेले नाही तर आपण जे गटार बनवले त्या गटाराला काही अर्थ राहात नाही. आपल्या या शहरामध्ये आपण बऱ्याचशा योजना आखण्याचा प्रयत्न करतो. इकडे काही नगरसेवक, नगरसेविका चार-चार टर्ममध्ये आहेत. आपणसुध्दा स्वतः चौथ्या टर्ममध्ये आहात. परंतु या शहराचा हवा तसा कायापालट आपण करू शकलो नाही. आम्हाला दुःख वाटते. आम्ही सुध्दा त्या टर्ममध्ये आहोत. परंतु आम्हाला जे हवे आहे, जे वाटते ते माहिती असेल की, पूर्वी या

मा. महासभेमध्ये कविवर्य होते. कविवर्य श्री. लिओ कोलासो. त्यांनी आपल्या महापालिकेबद्दल कविता लिहिली होती. बऱ्याच लोकांनी ऐकलीपण असेल. ९१ साली त्यांनी लिहिली होती.

**प्रभात पाटील :-**

९२ च्या निवडणुकीत वापरली गेली.

**जयंत पाटील :-**

आपल्याला ती कविता आठवते का? "हिरवे डोंगरे, निळे सागर; शुभ्र मिठागर, बनवू या सुंदर मिरा भाईंदर." परंतु सुंदर मिरा भाईंदर झालेला दुर्दैवाने आपल्याला दिसत नाही. या शहरात अतिशय चांगले हिरवेगार बगीचे असावेत. एक रस्ता आपले मा. आयुक्त साहेब असतानाचा बनला गेला. ३०-३२ कोटीचा रस्ता बनवला गेला. त्याला मधोमध बगीचा बनवला गेला. परंतु आजपर्यंत बगीचा झालाच नाही. तो जागेवर आहे का? त्याच्या जाळ्या ठेवलेल्या आहेत का? तो रस्ता तुटला की नाही? काही कारणामुळे आपण त्याचे जे सुशोभीकरण केले होते. ते सुशोभीकरण फेल झालेले आहे. आम्ही मधल्या काळामध्ये आपले लाडके मा. आमदार श्री. गिल्बर्टजी मेंन्डोसा यांच्याबरोबर नागपूर शहरात गेलो. अतिशय सुंदर सिटी आहे. आणि त्या मानाने आपले शहर तर खूप छोटे आहे. आपण एवढा प्रचंड खर्च आत्तापर्यंत केलेला आहे. परंतु या खर्चाचे नियोजन कमी असल्याकारणाने आपण लोकांना जे दिसायला पाहिजे ते दिसत नाही. मी आत्ता एका वेगळ्या विषयावर येतो. गाड्यांचा खर्च आपण आपल्या बजेटमध्ये दाखवलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

तुम्ही जो रस्त्याचा आणि गटाराचा उल्लेख केला त्याचा मी तुम्हाला फक्त सपोर्ट करते. मला असे वाटते की, मी कार्यकारी अभियंतांना पत्र दिले आहे. आपण विमल डेअरीकडून जाणारा नाला बोललात. पण इंद्रलोक फेज-४ च्या इथे चौकी झाली आहे, तिथे मध्येच विजेचा टॉवर आणि दोन्ही बाजूने, तुमची गाडी तिथून रोज जाते. आपल्याला कल्पना नसेल तर तिथे आत्तापर्यंत चार गाड्या पडल्या आहेत. ड्रायव्हर सहीत, आपल्या माणसांसहीत गटारात गेले आहेत आणि काढून तिथे बाजूचे लोक येतात आणि निर्मन्युष्य रस्ता आहे.

**जयंत पाटील :-**

तिकडे नवीन वस्ती होते आहे.

**प्रभात पाटील :-**

नवीन वस्ती होते तिथे एक गाडीसुध्दा व्यवस्थित जावू शकत नाही. एवढा मोठा टर्न तिथे आहे.

जयंत पाटील :-

साहेब, वाहन विभागासंबंधी मला जी माहिती मिळाली ती तुम्हाला दाखवतो. २००५ आणि २००६ साली.......

**मर्लिन डिसा :-**

श्री. पाटील साहेब, मी गटाराविषयी बोलते. एम.टी.एन.एल. रोडचे गटार अर्धवट झालेले आहे. अजून ते कम्प्लीट केलेले नाही. त्याचा ठराव मागील ४-५ वर्षा अगोदर पास झालेला आहे आणि तिकडे आत्ता मोकळ्या जागी माती भराव चालू आहे. लोकांना प्रॉब्लेम होणार आहे. त्यासाठी काय करणार आहात ते पण मला विचारायचे होते.

**जयंत पाटील :-**

२००५-२००६ साली आपल्याकडे १०३ वाहने आपल्याकडे आहेत. आणि त्या १०३ वाहनांसाठी २००५-०६ साली ५५ लाख दुरुस्तीसाठी वापरले. २००६-०७ साली दुरुस्तीसाठी ८७ लाख रुपये खर्च झाला. २००७-०८ साली १ करोड १७ लाख दुरुस्तीवर खर्च झाला आणि २००९-१० साली ३ लाख ८८ हजार १३२ रुपये हा खर्च फेब्रुवारीपर्यंत झालेला आहे. म्हणजे मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, एकूण १०३ गाड्यांवर आपण २ कोटी ९१ लाख १८ हजार दुरुस्ती केलेली आहे. याचा अर्थ असा होतो, म्हणजे हे आणलेले तसेच. गाड्या नवीन आणल्या नाहीत. मला वाटते गाडी नवीन आणल्या आणल्या आपण गॅरेजला पाठवली. तसा अर्थ होऊ शकेल आणि १०३ वाहने पकडली तर २ लाख ८२ हजार ५२४ हा दुरुस्ती खर्च आपण प्रत्येक गाडीमागे केलेला आहे. याचा अर्थ असा निघतो. म्हणजे आपण आणताना सेकन्ड हॅन्ड गाड्या आणल्या होत्या का? आपण एखादे नवीन वाहन आणले तर ते वाहन कमीत कमी चार ते पाच वर्षे आपल्याला दुरुस्ती व्हायला नाही पाहिजे. जे लोक गाडी वापरतात ते सांगु शकतील. याचा शोध घेणे गरजेचे आहे. मी श्री. पाटील यांचे अभिनंदन करेन. मी सभेमध्ये असे विषय मांडेन की, ही वाहने आपण बाहेरुन ठेका पध्दतीनेच घ्या. संपूर्ण वाहन, ड्रायव्हरसकट घेऊ शकतो तर तुमचा हा खर्च वाचू शकतो. तुम्ही लावलेल्या सी.एन.जी. चा किती सी.एन.जी. गाड्यांचा वापर केला गेला? किती गाड्यांमध्ये सी.एन.जी. टाकले गेले? ही तुम्ही चौकशी करा. मग तुम्ही गाड्यांना सी.एन.जी. बसवता आणि त्याच्यामध्ये सी.एन.जी. टाकत नाही. गॅस टाकत नाही. म्हणजे सी.एन.जी. बसवले ही तुम्हांला मजा वाटली का? फक्त जनतेचा पैसा आहे. आपण कर वाढवतो. कर वाढवणे ही गरज आहे, हे सगळ्यांना माहित आहे. खाजगीमध्ये आमच्या भारतीय जनता पक्षाचे मित्र म्हणतात, कर वाढवायची गरज आहे. कारण आपल्याला २०० एम.एल.डी. ची पाण्याची योजना राबवायची आहे. ती जर राबवली नाही तर या अडीच वर्षामध्ये तुमचे लोक आपल्याला विचारणार सुध्दा नाहीत. सर्व नगरसेवकांनी ही

गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, येणाऱ्या अडीच वर्षामध्ये आपल्याला या शहरातील जनतेला पाणी दिले पाहिजे. आणि ते पाणी देण्यासाठी निश्चितच करवाढ साहजिकच आहे. आत्ता आमचे सन्मा. माजी महापौर, आमचे मित्र श्री. नरेंद्र मेहता साहेब यांनी नक्की काय ठराव मांडला ते मला कळलेले नाही. ते एका ठिकाणी बजेटला मंजूरी देतात, एका ठिकाणी ते मा. मुख्यमंत्री साहेबांना पत्र पाठवतात. कालचेच पत्र आहे. ते पत्र काय आहे ते सांगतो.

**नरेंद्र मेहता** :-

माझ्या माहितीप्रमाणे मराठीमध्ये पत्र आहे आणि मी ठरावाचेपण मराठीमध्ये वाचन केले आहे. दोन्ही एकच आहे......

**जयंत पाटील :-**

मला कॉन्ट्रवर्सी दाखवायची आहे. एका ठिकाणी आपण बजेटला मंजूरी देताना म्हणतो.......

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही त्या विषयावर विरोध केलेला आहे. दरवाढ केलेली आहे. त्या पत्रात पण म्हंटलेले आहे. जरा वाचून घ्या.

**जयंत पाटील :-**

या विषयामध्ये मुळातच असे आहे की, मिटींगच अनधिकृत आहे. ही मिटींग अधिकृत नाही. असा यांचा विषय आहे आणि आजच्या बजेटमध्ये मिटींगला कुठल्याही तऱ्हेची मान्यता मा. मुख्यमंत्र्यांनी देऊ नये अशातऱ्हेचे पत्र माझ्याकडे आहे. म्हणजे एकीकडे याच्यावर चर्चा करायची. मग चर्चा तरी का करायची? या जनेतसाठी आपण काहीतरी करतो. या जनतेला काहीतरी द्यायचे म्हणून आपण इकडे सभा लावलेली आहे आणि बोलतो आहे. आणि असे असताना एका ठिकाणी मा. मुख्यमंत्र्यांकडे वेगळे पत्र पाठवायचे आता हे पत्र श्री. नरेंद्र एल. मेहता यांचे आहे. म्हणजे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेनेची याला मान्यता आहे का? ते आम्हांला कळले पाहिजे. असे असेल तर तुम्ही इकडे बजेटवर चर्चाच करु शकत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभागृह नेता यांना माहितीसाठी सांगतो. जर त्यांना अपुरी माहिती असेल तर भारतीय जनता पक्षाने तसे पत्र दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

मुळातच माजी महापौर आपल्या पदावर असताना आपण सभा का लावली नाही. आपल्याला ज्यावेळेस विषय पाठवला गेला की, करवाढ घेण्यासाठी आपण सभा लावा. आपण लावली नाही. तो विषय आपण आणला नाही. आणि तो विषय आणू नये म्हणून आपलेच सदस्य सांगतात की हा विषय कुठे घेता ही काय चालूगीरी आहे? मा. मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्राच्या शेवटच्या चार ओळी मी वाचून दाखवतो. तरी या सर्व बेकायदेशीर बाबींमध्ये आपण जातीने लक्ष घालून त्वरीत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या बेकायदेशीर दरवाढ करून बनविण्यात आलेल्या अर्थसंकल्पास स्थगिती देण्यात यावी. जेणेकरून बेकायदेशीररित्या चालू असलेल्या कार्यवाहीस आळा बसेल. आपण योग्य ती कारवाई करून मिरा भाईंदरच्या नागरिकांस न्याय मिळवून द्यावा. आत्ता मिरा भाईंदरच्या नागरिकांना न्याय पाहिजे की, स्वतःला पाहिजे? नक्की न्याय कोणाला पाहिजे? बेकायदेशीर व्यवहार तुमचे आत्तापर्यंत चाललेले आहेत. बेकादेशीररित्या तुम्ही शुटींग करत होते. तुमचे सगळेच बेकायदेशीर आहे आणि हे पत्र बेकायदेशीर आहे. तुम्ही कोणती गोष्ट कायदेशीर केली हे सांगा. आत्ता सेव्हन इलेव्हन ही कंपनी तुमच्या नावाची नाही असे तुम्ही म्हणू शकत नाही. ते तुम्ही म्हणून शकता का की, सेव्हन इलेव्हन कंपनी तुमची नाही?

**नरेंद्र मेहता :-**

ॲफीडेव्हीट देऊ शकतो.

**जयंत पाटील :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु करा. माझे भाषण संपवतो.

**प्रभात पाटील :-**

एक सुचना आहे. ठरावामध्ये समाविष्ट करावी. आपल्या शहरामध्ये शैक्षणिकदृष्ट्या काही उपक्रम राबविण्यासाठी आपण कुठेतरी कमी पडतो असे मला वाटते. प्राथमिक शाळांपर्यंत शिक्षण, पुढे स्पर्धात्मक परिक्षांना विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागते. अशावेळेला महापालिकेकडून त्यांच्यासाठी काही सोयी आणि सुविधा व्हाव्यात, त्यांना मिळाव्यात असे मला वाटते. तर शहरामध्ये अशा स्पर्धात्मक परिक्षांना बसणारे जे विद्यार्थी आहेत मग ते आयपीएस चे असोत, आयएएस चे असोत, कोणत्याही मोठ्या क्षेत्रामध्ये कार्यरत होणारे जे सक्षम अधिकारी आपल्या शहरातून तयार होतील, त्यांच्यासाठी शिबीर किंवा त्यांना अभ्यासासाठी जागा किंवा इतर काही गोष्टी प्राप्त करुन देण्यासाठी आपल्या बजेटमध्ये १५ ते २० लाखाची तरतुद करण्यात यावी अशी सुचना मी बजेटमध्ये मांडते. दुसरी गोष्ट, वृक्षप्राधिकरणमध्ये मला असे म्हणायचे आहे की, प्रत्येक शहराची एक ओळख असते. जसे तुम्ही बँगलोरला गेला तर उद्यानाचे शहर आहे. तुम्ही जयपूरला गेलात तर पिंक सिटी आहे. तर शहरामध्ये असे एक उद्यान तयार करा की, जिथे रोझ गार्डन असो किंवा आणखीन. मला असे वाटते आपण आणखीन कुठेतरी एक सहल केलेली, चंदिगडला, तिथे रॉक गार्डन होते. खडकांपासून तयार केलेले

अतिशय सुंदर उद्यान होते. अशी शहराची ओळख होईल असे काहीतरी त्या वृक्षप्राधिकरणमध्ये तुम्ही निर्माण करा. जेणेकरुन या शहराची एक वेगळी ओळख तयार होईल. त्याच्यामध्ये ती तरतुद करण्यात यावी अशी माझी सुचना आहे. आणि महिला बालकल्याणचे जे बजेट आहे, मा. आयुक्त साहेब आपण आलात तेव्हा मी म्हंटले होते की, आपण ती कमिटी फॉर्म करावी आणि आपल्या एका वर्षाच्या काळामध्ये ती झाली सुध्दा. उद्या त्याचे सभापती बनतील. पण तत्पूर्वी मला असे म्हणायचे आहे की, महिला आणि बाल यांच्यासाठी स्पेशल महिला समाज म्हणून एक इमारत बांधावी त्यांनी कुठेतरी जागेची प्रोव्हीजन करा. इथे महिला विषयक कार्यक्रम आखले जातील. बालकांविषयीचे कार्यक्रम घेतले जातील. अशी मी सुचना मांडत आहे आणि तुमच्या बजेटमध्ये त्यासाठी तरतूद करण्यात यावी. अशा माझ्या तीन सुचना आहेत. कृपया त्यांचा अंतर्भाव करण्यात यावा.

**प्रफुल्ल पाटीलः-**

ठरावावर नंतर मतदान घ्या. अजून चर्चा कुठेच सुरुच झाली नाही. या ठिकाणी सर्वांना कामे पाहिजेत. उद्यापासून सर्व आत्ता बजेट मंजूर झाला आमचे काम करा. पण तुम्हाला पुढच्या वर्षात बांधकाम विभागाकडे, कायदेशीररित्या बघायला गेले तर, एकही पैसा नाही. मागच्या वर्षाची १४ कोटीची बिले बाकी आहेत. आणि यावर्षी आपली प्रोव्हिजन फक्त ७-८ कोटींची आहे. म्हणजे ती देऊनसुध्दा आपल्याला पुढच्या वर्षीचे पण बजेट जाईल. म्हणून या बजेटवर कुठेतरी गांर्भीयाने चर्चा व्हायला पाहिजे. या ठिकाणी आरोप, प्रत्यारोप करण्याची ही वेळ नाही. आपल्याला शहराचे चांगले साधायचे आहे. सुदैवाने जे.एन.एन.यु.आर.एम. नावाची एक योजना जन्माला आलेली आहे. त्याचा उपभोग कसा घेता येईल याच्याकडे आपण लक्ष द्यायचे आहे. आणि रोजचे आपले गाडे चालवायचेच आहे. म्हणजे रोजचा नास्ता, न्याहरी करायची आहे आणि एकदा चमचमीत जेवणपण जेवायचे आहे. हे सगळे करायचे असेल तर आपल्याला बजेटवर डिटेलमध्ये चर्चा करणे गरजेचे आहे. कारण ब-याच ठिकाणी असे होते आहे की, त्याच्यामध्ये आपण मार्ग काढू शकतो. बजेट तयार करताना कदाचित ते तयार करणा-या लोकांच्या लक्षात आलेले नसेल. कदाचित त्यांनी त्या अँगलने ते पाहिले नसेल. उदाहरणार्थ, जेसल पार्कचा सबवे काढून टाकला. ती अतिशय गरजेची बाब होती. तर अशा काही गोष्टी आहेत त्या रोजच्या याच्यातून राहिलेल्या आहेत आणि त्या पुढेपण राहणार आहेत. आणि म्हणून प्रत्येकाचे बजेट वाढवणे, त्याला योग्य बजेट देणे हे जास्त गरजेचे आहे.

**दिनेश नलावडेः-**

मा. महापौर साहेब, तो सबवे काढलेला नाही. आणि सकाळपासून बजेटवर चर्चा चालू आहे. आत्तापर्यंत तेच एकटे बोलतात तुम्ही प्रत्येकाला बोलायला किती वेळ दिलेला आहे. एकटा सभापती बजेट बनवत नसतो. बजेट हे सर्व १६ सदस्य बनवत असतात. त्यांच्याबरोबर प्रशासन देखील आहे. आपण स्वतः हुशार आहात हे सगळया भाईंदरच्या जनतेला माहिती आहे.

**प्रफुल्ल पाटीलः-**

सबवे चे असेल तर दाखवा.

**दिनेश नलावडेः-**

अभ्यास करून वाचा. नंतर आम्हाला या सभागृहामध्ये बोला.

**प्रफुल्ल पाटीलः-**

तुम्हाला शिकायला पाहिजे असे मला वाटते.

**अनिल सावंतः-**

मा. महापौर साहेब, त्या बजेटमध्ये सबवे आणि कल्वर्ट हेडींग आहे. तो अभ्यास करा. आठ करोड रुपये प्रोव्हिजन केले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रफुल्ल पाटीलः-**

तुम्हाला स्वतःलाच माहिती नाही. कल्वर्ट चा खर्च कीती आहे? एस्टीमेट किती काढलेले?

**चंद्रकांत मोदीः-**

साहेब, एक-एक घंटा भाषण करना तो.....

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौरः-**

सचिव साहेब, आपण ठराव वाचून घ्या.

**लक्ष्मण जंगमः-**

सभागृहाचे काम अतिशय शांततेने, चांगल्या पध्दतीने चालू असताना प्रत्येक सदस्यांनी किती हूशार आहेत, किती विद्वान आहेत याच्या पलिकडे जाऊन आपण काय बोलतो हा महत्वाचा विषय आहे. तुम्ही कितीही चांगल्या पध्दतीचे मार्गदर्शन करत असताना एखादा शब्द घालून जर या सभागृहामध्ये गोंधळ होत असेल, तर अशा पध्दतीचा शब्द तुम्ही घालू नये. आपण किती विद्वान आहोत, त्याच्या पलिकडे जाऊन आपण काय चुक करतो ती प्रत्येकाच्या लक्षात यायला पाहीजे. सगळे विद्वान आहेत. कोण जास्त असेल, कोण कमी असेल. पण सभागृहामध्ये कोणी ही अशी वाच्छता करू नये. या ठिकाणी आपल्या महिला भगीनी बसलेल्या आहेत. म्हणून अशा पध्दतीचे वक्तव्य करु नका.

**मा. महापौरः-**

चर्चेने चर्चा वाढते. आपण बसून घ्या.

**प्रफुल्ल पाटीलः-**

मी बोलत असताना सन्मा. सदस्य श्री. दिनेश नलावडे उठून बोलले. म्हणजे त्यांनी बोलले का? त्यांनी उपटा वगैरे शब्द काढले. मी घंटा वाजवू नका असे बोललो. आणि विषय सरळ-सरळ आहे की, कल्वर्ट वर आठ कोटी रुपये खर्च आहे आणि याच्यामध्ये फक्त ११ कोटीची तरतुद आहे. आपल्याला माहिती आहे की, आपणच मागे ४० कोटी रुपयांची मायक्रो टॅनलींग बेस पुशिंगची मंजूरी दिलेली.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौरः-**

सगळयांनी बसून घ्या. सचिव साहेब, ठराव वाचून घ्या.

**प्रफुल्ल पाटीलः-**

बजेटवर अजून काहीच चर्चा झाली नाही. एक पानसुध्दा चर्चा झाली नाही.

**जूबेर इनामदारः-**

सचिव साहेब, दोन्ही ठराव वाचून झालेले आहेत. दोन्ही ठराव सभागृहामध्ये मांडलेले आहेत. तुम्ही वाचून घ्या आणि मतदानाची प्रक्रिया पूर्ण करून घ्या.

**प्रफुल्ल पाटीलः-**

बजेटवर तुमचे किती विषय राहिले आहेत. तुम्ही आज जर जेसल पार्कचा सबवे करायचा झाला.

**मा. महापौरः-**

श्री. प्रफुल्ल पाटील, आपल्या सुचना घेण्यात येतील. ठराव वाचू द्या. आपण सुचना घेऊ. तुमच्या सुचना चांगल्या आहेत. आपण घेऊ.

**प्रफुल्ल पाटीलः-**

एकदा तुमचा ठराव झाल्यानंतर काय? मुळ बजेटपेक्षा वेगळा आहे.

**मा. आयुक्तः-**

हेड दुरुस्त करुन जी रक्कम आहे ती वाढवून घेतो.

**प्रफुल्ल पाटीलः-**

ते वाढवल्यानंतर तुम्ही त्याच्यासमोर उत्पन्न कोणते दाखवणार? आम्हाला हे सांगा की, या लेखाशिर्षामधून आठ करोड रुपये काढून आम्ही या लेखाशिर्षाकडे वर्ग करतो.

**मा. आयुक्तः-**

प्रभाग समिती जे आहेत, दोनदा पडलेले आहेत, त्यामधील आठ कोटी वर्ग करु.

**मा. महापौरः-**

तीन ठराव आलेले आहेत. ठराव वाचून घ्या. मग बोला.

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ६४ करिता एकुण तीन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सूचक आहेत श्री. भगवती शर्मा, अनुमोदक श्री. एस.ए. खान आहेत. त्याच्यामध्ये सुचना आहेत.

**प्रशांत पालांडेः-**

सचिव साहेब, माझा ठराव मागे घेतो. त्याच्या ऐवजी श्री. नरेंद्र मेहता यांच्या ठरावाला ती सुचना म्हणून स्विकारा.

**नगरसचिवः-**

श्री. प्रशांत पालांडे यांनी मांडलेला ठराव मागे घेतला असे त्यांनी जाहिर केलेले आहे. त्या ठरावाला सुचना म्हणून स्विकारायची आहे. आत्ता एकूण दोनच ठराव शिल्लक राहिलेले आहेत. दोन्ही ठरावाचे मी अनुक्रमे पहिला ठराव सुचक श्री. भगवती शर्मा, दुसरा ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता आहेत. अनुक्रमे दुसरा ठराव मी वाचन करून मतदानास टाकतो. सन २००९-१० च्या सुधारीत व २०१०-११ च्या मुळ अर्थसंकल्पावर चर्चा करुन अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबतचा विषय सभागृहासमोर आला आहे.

स्थायी समितीसमोर अंदाजपत्रकास मान्यता देण्याचा विषय दि. ११/०३/२०१० च्या सभेत ठेवण्यात आला असता अंदाजपत्रकात महानगरपालिकेने आकारावयाच्या विविध करात दरवाढ व नविन कर लागू करणेबाबत कोणताही विषय स्थायी समितीच्या विषय पत्रिकेवर नव्हता. तरीदेखील महानगरपालिका प्रशासनाने विविध करात दरवाढ करुन लगेच नविन कर प्रथमतःच आकारुन दरवाढीसह व तसेच १४८ कोटी रुपये M.M.R.D.A. कडून कर्ज घेण्याकरीता व भुयारी गटार योजनासाठी २५६ कोटी रुपयेचा प्रस्ताव महानगरपालिका, राज्य सरकार, केंद्र सरकारनी मंजुरी घेतली असताना ४९१ कोटी रुपये निविदेला मान्यता दिली. कर्ज घेण्यासाठी व तसेच भुयारी गटार योजनेच्या वाढीव रकमेची निविदा मंजूरीसाठी मा. महासभेची मान्यता आवश्यक होती. मा. महासभेने वरील दोन्ही प्रकरणासाठी कुठल्याही प्रकारची मान्यता दिलेली नसताना अर्थसंकल्प व अंदाजपत्रक महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवला आहे जो पूर्णतः बेकायदेशीर आहे.

महानगरपालिकेस कोणतीही दरवाढ करावयाची असल्यास त्यास फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेपूर्वी मान्यता घेण्यात यावी अशी तरतुद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ मध्ये आहे.

तथापी मनपा प्रशासनाने महानगरपालिका अधिनियमाचे उल्लंघन करुन बेकायदेशीरपणे दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा लोन व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल करुन अंदाजपत्रक व सुधारीत अर्थसंकल्प तयार केले आहे म्हणून आमचा या दरवाढीस व १४८ कोटी रुपयाचा लोन व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल केल्याबद्दल तीव्र विरोध व आक्षेप आहे.

प्रशासनाने केलेली बेकायदेशीर सर्व दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा M.M.R.D.A. चा लोन प्रस्ताव व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल वगळून भाजपा, शिवसेना व अपक्षच्या सदस्यांनी केलेल्या सुचना विचारात घेऊन त्यानुसार होणाऱ्या अंदाजपत्रकास व अर्थसंकल्पास आम्ही मान्यता देत आहोत.

तरी सन २००९-१० च्या सुधारीत व २०१०-११ च्या मुळ अर्थसंकल्पात प्रशासनाने केलेली सर्व दरवाढ व १४८ कोटी रुपयाचा M.M.R.D.A. चा लोन प्रस्ताव व भुयारी गटार योजनेतील रक्कमेत बदल वगळून भाजपा, शिवसेना व अपक्षच्या सदस्यांच्या सुचना स्विकारुन अंदाजपत्रकास आम्ही मान्यता देत आहोत.

सुचक श्री. नरेंद्र मेहता, अनुमोदन श्री. प्रशांत पालांडे. या ठरावावर सुचना आलेली आहे. प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी स्थानिक संस्था कर लागू करणे. सूचक श्री. प्रविण पाटील, अनुमोदन श्री. प्रशांत पालांडे ही सुचना वाचतो राज्य शासनाने १ एप्रिल २०१० पासून तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वार मिरा भाईंदर क्षेत्रात स्थानिक संस्था कर लागू करण्यात आल्याचे जाहिर केले आहे. सन २००८ मध्ये राज्य शासनाने जकात ऐवजी उपकर लागू केला होता. त्याकाळात सुमारे ३.६ महिन्याच्या कालावधीत महापालिकेचे १२.५ कोटी रु. उपकरामुळे कमी प्राप्त झाले म्हणून राज्य शासनाने महापालिकेला झालेली नुकसान भरपाई अनुदान स्वरुपाने द्यावी अशी मागणी प्रशासनाने राज्य शासनाकडे केलेली आहे. १ एप्रिल २०१० ऐवजी स्थानिक संस्था कर प्रायोगिक तत्वावर लागु केल्यास मिरा भाईंदर महानगरपालिकेला जकातीच्या उत्पन्नाच्या सुमारे ५० टक्के पेक्षा जास्त जकातीच्या महसुली उत्पन्नात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण आज मंजूर करणाऱ्या २०१०-२०११ च्या अर्थसंकल्पातील विकास कामावर करण्यात आलेल्या तरतुदींवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. म्हणून मी खालील ठराव मा. महापौरांच्या संमतीने मांडीत आहे व त्यास सभागृहाने अनुमती द्यावी अशी मी विनंती करीत आहे. १) २००८ साली जकाती ऐवजी उपकर लागू केल्यामुळे महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसान राज्य शासनाने संपूर्णपणे अनुदान स्वरुपाने भरपाई करुन द्यावी. २) १ एप्रिल २०१० पासून जकाती ऐवजी स्थानिक संस्था कर लागू केल्यास महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात घट झाल्यास त्याची १०० टक्के भरपाई राज्य शासनाने करुन द्यावी. या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने |
|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | वर्षा गिरधर भानुशाली |
| ३ | भोईर राजु यशवंत |
| ४ | जाधव मोहन महादेव |
| ५ | सिंह मदन उदितनारायण |
| ६ | म्हात्रे कल्पना महेश |
| ७ | पाटील शरद केशव |
| ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ९ | बाविघर सिसिलीया विजय |
| १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ११ | दुबे रामनारायण सदानंद |
| १२ | यादव मिरादेवी रामलाल |
| १३ | प्रविण मोरश्वर पाटील |
| १४ | पाटील अनंत रामचंद्र |
| १५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| १७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| १८ | गणेश गोपाळ शेट्टी |
| १९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल |
| २० | व्यास सुधा वासुदेव |

या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत

| अ.क्र. | ठरावाच्या विरोधात |
|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग |
| २ | नलावडे दिनेश दगडू |

| | |
|---|---|
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर |
| ४ | सुनिता कैलास पाटील |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश |
| ६ | सावळे निर्मला बाबुराव |
| ७ | कुरेशी याकुब ईस्माईल |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय |
| ९ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत |
| ११ | सपार उमा विश्वनाथ |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर |
| १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज |
| १५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन |
| १६ | शफीक अहमद सादत खान |
| १७ | प्रमोद जयराम सामंत |
| १८ | मर्लिन मर्विन डिसा |
| १९ | वैती विजया हेमचंद्र |
| २० | सौ.ठाकूर कल्पना हरिहर |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे |
| २४ | भट दिप्ती शेखर |
| २५ | अनिल दिवाकर सावंत |
| २६ | शेख सलिम दाउद |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे |
| २८ | नयना गजानन म्हात्रे |
| २९ | तिवारी दिव्या अशोक |
| ३० | वैती नर्मदा यशवंत |
| ३१ | पाटील जयंत महादेव |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र |
| ३३ | पाटील मिलन गोविंदराव |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन |
| ३५ | शेख आसिफ गुलाब |
| ३६ | गोविंद हेलन जॉर्जी |
| ३७ | डिमेलो बर्नड आल्बर्ट |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी |
| ३९ | मेन्डोंसा स्टिवन जॉन |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद |
| ४१ | पाटील वंदना मंगेश |
| ४२ | चक्रे वंदना रामदास |
| ४३ | माळी हेमा रविंद्र |
| ४४ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप |
| ४५ | परेरा टेरी पॉल |

तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत

| अ.क्र. | तटस्थ |
|---|---|
| १ | पाटील उमाताई शाम |
| २ | शशिकांत जगन्नाथ भोईर |
| ३ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ |
| ४ | पाटील प्रेमनाथ गजानन |
| ५ | मिलन वसंत म्हात्रे |

मी पहिल्या ठरावाचे वाचन करतो. सुचक आहेत श्री. भगवती शर्मा, अनुमोदक श्री. एस.ए. खान.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरणपत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे रक्कम रु. ११ लक्ष शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे. शासनाकडील मिळणारे अनुदान पाच वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने मिळत होते ते बंद झाल्याने त्यानंतर मनपा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मनपा स्वयंपूर्ण व्हावी यास्तव कर/दर वाढ करण्यात आल्याने वाढीव कर/दराचे उत्पन्नास शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

**सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक "अ"+"ब"+"क"+"वृक्षप्राधिकरण"+"महिला व बालकल्याण"+ "JNNURM"+"P" एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

याला सुचना आलेल्या आहेत. श्री.एस.ए. खान यांची सुचना आहे. दि. ३१/०३/२०१० रोजी होणाऱ्या अर्थसंकल्पीय महासभेमध्ये मी अशी सुचना मांडतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे सन २००७-०८ ते २००९-१० या वर्षात पालिका हद्दीतील सृष्टी कॉम्प्लेक्स, शांती नगर, जेसल पार्क या वसाहतीतील रहिवाश्यांना चुकीच्या पध्दतीने लावण्यांत येणारा विशेष स्वच्छता कर १३% ऐवजी ६% दराने लावण्यांत यावा व सन २०१०-२०११ पासून ८% दराने लावण्यांत यावा आणि १३% लावलेला विशेष स्वच्छता कर रद्द करण्यांत यावा. आणखीन एक सुचना आहे. सुचक श्री. भगवती शर्मा, अनुमोदक श्री. लक्ष्मण जंगम आहेत मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सन २००९-२०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील १) प्रभाग समिती निधी, २) नविन फायर फायटर खरेदी, ३) संगणक प्रणाली / नेटवर्कींग सुरु करणे, संगणक हार्डवेअर्स साहित्य खरेदी व इतर आवश्यक कामे, ४) कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग तसेच JNNURM लेखाशिर्षाखाली जमा असलेली रक्कम ३१ मार्च २०१० रोजी खर्च न पडणारी रक्कम, १) नविन रस्ते बांधकाम २) नविन गटारे / नाले बांधकाम, ३) डी.पी. रोड बांधकाम, ४) रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा, ५) इंडस्ट्रीयल मधील रस्ते / गटारे सुधारणा, ६) सर्व धर्मीय उत्सव या लेखाशिर्षाखाली वर्ग करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०१० पूर्वी प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षाखाली केलेल्या तरतुदीनुसार वार्षिक दराची विभागवार निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे. आणखीन एक सौ. प्रभात पाटील यांची सुचना आहे महिला व बालकल्याण अंदाजपत्रकात महिला भवन निर्मितीसाठी ठराविक (अंदाजित) रक्कमेची तरतुद करण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना I.A.S. / I.P.S. / M.P.S.C. या स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करण्याकरीता शहरातील खाजगी संस्थेच्या सहकार्याने प्रशिक्षण संस्था / केंद्र महानगरपालिकेमार्फत चालु करण्याकरीता अर्थसंकल्पात रु. २०.०० लाख एवढी तरतूद करण्यात यावी.

सौ. प्रभात पाटील यांची अजून एक सुचना आहे. (महिला बालकल्याण) श्री. मिलन पाटील यांची सुचना आहे. आमच्याकडे लेखी सुचना आलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर सो. करयोग्य मुल्य कशाप्रकारे ठरवता येईल ही कायद्यात तरतूद आहे. कायद्याच्या विरुध्द कुठलीही ठराव किंवा सुचना होऊ शकत नाही १० टक्के वर करण्याची प्रोव्हीजन महाराष्ट्रामध्ये नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, एका ठरावावर मतदान झालेले आहे. आत्ता सुचना कशी घेता येईल?

**नगरसचिव:-**

त्यांनी सुचना वाचली होती. फक्त जमा केलेली नाही. जे मालमत्ता करात भाडे तत्वावर ३७ % दिले आहेत, त्यामध्ये १६ % द्यावे. या सुचनांसह ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने |
|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग |
| २ | नलावडे दिनेश दगडू |
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर |
| ४ | सुनिता कैलास पाटील |

| | |
|---|---|
| ५ | पाटील प्रभात प्रकाश |
| ६ | सावळे निर्मला बाबुराव |
| ७ | कुरेशी याकुब ईस्माईल |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय |
| ९ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत |
| ११ | सपार उमा विश्वनाथ |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर |
| १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज |
| १५ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन |
| १६ | शफीक अहमद सादत खान |
| १७ | प्रमोद जयराम सामंत |
| १८ | मर्लिन मर्विन डिसा |
| १९ | वैती विजया हेमचंद्र |
| २० | सौ.ठाकूर कल्पना हरिहर |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे |
| २४ | भट दिप्ती शेखर |
| २५ | अनिल दिवाकर सावंत |
| २६ | शेख सलिम दाउद |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे |
| २८ | नयना गजानन म्हात्रे |
| २९ | तिवारी दिव्या अशोक |
| ३० | वैती नर्मदा यशवंत |
| ३१ | पाटील जयंत महादेव |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र |
| ३३ | पाटील मिलन गोविंदराव |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन |
| ३५ | शेख आसिफ गुलाब |
| ३६ | गोविंद हेलन जॉर्जी |
| ३७ | डिमेलो बर्नड आल्बर्ट |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी |
| ३९ | मेन्डोंसा स्टिवन जॉन |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद |
| ४१ | पाटील वंदना मंगेश |
| ४२ | चक्रे वंदना रामदास |
| ४३ | माळी हेमा रविंद्र |
| ४४ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप |
| ४५ | परेरा टेरी पॉल |

या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत

| अ.क्र. | ठरावाच्या विरोधात |
|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद्र |
| २ | वर्षा गिरधर भानुशाली |
| ३ | भोईर राजु यशवंत |
| ४ | जाधव मोहन महादेव |
| ५ | सिंह मदन उदितनारायण |
| ६ | म्हात्रे कल्पना महेश |
| ७ | पाटील शरद केशव |

| | |
|---|---|
| ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर |
| ९ | बाविघर सिसिलीया विजय |
| १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार |
| ११ | दुबे रामनारायण सदानंद |
| १२ | यादव मिरादेवी रामलाल |
| १३ | प्रविण मोरश्वर पाटील |
| १४ | पाटील अनंत रामचंद्र |
| १५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव |
| १६ | गावंड मंदाकिनी आत्माराम |
| १७ | म्हात्रे मोहन गोपाळ |
| १८ | गणेश गोपाळ शेट्टी |
| १९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल |
| २० | व्यास सुधा वासुदेव |

तटस्थ असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

| अ.क्र. | तटस्थ |
|---|---|
| १ | पाटील उमाताई शाम |
| २ | शशिकांत जगन्नाथ भोईर |
| ३ | पाटील प्रफुल्ल काशीनाथ |
| ४ | पाटील प्रेमनाथ गजानन |
| ५ | मिलन वसंत म्हात्रे |

**मा. महापौर :-**

सुचक श्री. भगवती शर्मा, अनुमोदक श्री. एस.ए. खान व सुचनांच्या बाजूने ४५ मते, विरोधात २० मते आणि तटस्थ बहुमते. असा श्री. भगवती शर्मा यांनी मांडलेला ठराव बहुमताने पारीत करण्यात आलेला आहे.

**प्रकरण क्र. ६४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ ‘‘अ’’ + ‘‘क’’ + ‘‘अंध व अपंग’’ + ‘‘महिला बालकल्याण’’ + ‘‘JNNURM’’ + ‘‘P’’ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४८, ठराव क्र. ११८)

**ठराव क्र. ६८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २००९-१० चे सुधारीत व सन २०१०-११ च्या मुळ अंदाजपत्रकाबाबतचे विवरणपत्र, अहवाल, मा. स्थायी समिती ठराव क्र. ११८, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून सविस्तर चर्चा करुन मा. सदस्यांच्या सुचनेनुसार व आवश्यक त्या दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे रक्कम रु. ११ लक्ष शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे. शासनाकडील मिळणारे अनुदान पाच वर्षापर्यंत टप्प्याटप्प्याने मिळत होते ते बंद झाल्याने त्यानंतर मनपा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मनपा स्वयंपूर्ण व्हावी यास्तव कर/दर वाढ करण्यात आल्याने वाढीव कर/दराचे उत्पन्नास शासनाची मंजूरी घेण्यात यावी.

**सन २००९-१० चे सुधारित अंदाज व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रक** **आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अंदाजपत्रक ‘‘अ’’+‘‘ब’’+‘‘क’’+‘‘वृक्षप्राधिकरण’’+‘‘महिला व बालकल्याण’’+ ‘‘JNNURM’’+‘‘P’’ एकूण जमा | ५१५६९.८६ | ५८३५५.८७ |
| अंदाजपत्रक ‘‘अ’’+‘‘ब’’+‘‘क’’+‘‘वृक्षप्राधिकरण’’+‘‘महिला व बालकल्याण’’+ ‘‘JNNURM’’+‘‘P’’ एकूण खर्च | ४८६४८.१५ | ५८३४४.८७ |
| अखेरची शिल्लक | २९२१.७१ | ११.०० |

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. एस. ए. खान व अनुमोदक श्रीम. शानु गोहिल यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

दि. ३१/०३/२०१० रोजी होणाऱ्या अर्थसंकल्पीय महासभेमध्ये मी अशी सुचना मांडतो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे सन २००७-०८ ते २००९-१० या वर्षात पालिका हद्दीतील सृष्टी कॉम्प्लेक्स, शांती नगर, जेसल पार्क या वसाहतीतील रहिवाश्यांना चुकीच्या पध्दतीने लावण्यांत येणारा विशेष स्वच्छता

कर १३% ऐवजी ६% दराने लावण्यांत यावा व सन २०१०-२०११ पासून ८% दराने लावण्यांत यावा आणि १३% लावलेला विशेष स्वच्छता कर रद्द करण्यांत यावा.

**सदर ठरावामध्ये सुचक श्री. भगवती शर्मा व अनुमोदक श्री. लक्ष्मण जंगम यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मंजूर केलेल्या सन २००९-२०१० या वर्षाच्या अर्थसंकल्पातील १) प्रभाग समिती निधी, २) नविन फायर फायटर खरेदी, ३) संगणक प्रणाली / नेटवर्कींग सुरु करणे, संगणक हार्डवेअर्स साहित्य खरेदी व इतर आवश्यक कामे, ४) कल्वर्ट बांधकाम / भुयारी मार्ग तसेच JNNURM लेखाशिर्षाखाली जमा असलेली रक्कम ३१ मार्च २०१० रोजी खर्च न पडणारी रक्कम, १) नविन रस्ते बांधकाम २) नविन गटारे / नाले बांधकाम, ३) डी.पी. रोड बांधकाम, ४) रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा, ५) इंडस्ट्रीयल मधील रस्ते / गटारे सुधारणा, ६) सर्व धर्मीय उत्सव या लेखाशिर्षाखाली वर्ग करुन सर्व प्रलंबित देयके ३१ मार्च २०१० पूर्वी प्रदान करण्यास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने सन २०१०-२०११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात रस्ते देखभाल दुरुस्ती व सुधारणा या लेखाशिर्षाखाली केलेल्या तरतुदीनुसार वार्षिक दराची विभागवार निविदा मागविण्यास व खर्चास ही सभा प्रशासकीय व आर्थिक मान्यता देत आहे.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

महिला व बालकल्याण अंदाजपत्रकात महिला भवन निर्मितीसाठी ठराविक (अंदाजित) रक्कमेची तरतुद करण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विद्यार्थ्यांना I.A.S. / I.P.S. / M.P.S.C. या स्पर्धात्मक परिक्षांची तयारी करण्याकरीता शहरातील खाजगी संस्थेच्या सहकार्याने प्रशिक्षण संस्था / केंद्र महानगरपालिकेमार्फत चालु करण्याकरीता अर्थसंकल्पात रु. २०.०० लाख एवढी तरतूद करण्यात यावी.

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

जे मालमत्ता करात भाडे तत्वावर ३७% दिले आहेत, त्यामध्ये १६% द्यावे.

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | गोहिल शानु जोरावरसिंग | १ | मेहता नरेंद्र लालचंद्र | १) पाटील उमाताई शाम |
| २ | नलावडे दिनेश दगडू | २ | वर्षा गिरधर भानुशाली | २) शशिकांत जगन्नाथ भोईर |
| ३ | वेतोस्कर राजेश शंकर | ३ | भोईर राजु यशवंत | ३) पाटील प्रफुल्ल काशीनाथ |
| ४ | सुनिता कैलास पाटील | ४ | जाधव मोहन महादेव | ४) पाटील प्रेमनाथ गजानन |
| ५ | पाटील प्रभात प्रकाश | ५ | सिंह मदन उदितनारायण | ५) मिलन वसंत म्हात्रे |
| ६ | सावळे निर्मला बाबुराव | ६ | म्हात्रे कल्पना महेश | |
| ७ | कुरेशी याकुब ईस्माईल | ७ | पाटील शरद केशव | |
| ८ | म्हात्रे तुलसीदास दत्तात्रेय | ८ | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर | |
| ९ | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | ९ | बाविघर सिसिलीया विजय | |
| १० | जंगम लक्ष्मण गणपत | १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | |
| ११ | सपार उमा विश्वनाथ | ११ | दुबे रामनारायण सदानंद | |
| १२ | जुबेर अब्दुल्ला इनामदार | १२ | यादव मिरादेवी रामलाल | |
| १३ | श्रीम. पुजारी कांचन शेखर | १३ | प्रविण मोरश्वर पाटील | |
| १४ | श्री.वासुदेव भास्कर मुंज | १४ | पाटील अनंत रामचंद्र | |
| १५ | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | १५ | श्री.पालांडे प्रशांत भगवंतराव | |
| १६ | शफीक अहमद सादत खान | १६ | गावंड मंदाकिनी आत्माराम | |
| १७ | प्रमोद जयराम सामंत | १७ | म्हात्रे मोहन गोपाळ | |
| १८ | मर्लिन मर्विन डिसा | १८ | गणेश गोपाळ शेट्टी | |
| १९ | वैती विजया हेमचंद्र | १९ | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | |
| २० | सौ.ठाकूर कल्पना हरिहर | २० | व्यास सुधा वासुदेव | |
| २१ | चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | | | |
| २२ | मोदी चंद्रकांत भिकालाल | | | |
| २३ | सरिता चंद्रकांत म्हात्रे | | | |
| २४ | भट दिप्ती शेखर | | | |
| २५ | अनिल दिवाकर सावंत | | | |
| २६ | शेख सलिम दाउद | | | |
| २७ | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | | | |
| २८ | नयना गजानन म्हात्रे | | | |
| २९ | तिवारी दिव्या अशोक | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | वैती नर्मदा यशवंत | | | |
| ३१ | पाटील जयंत महादेव | | | |
| ३२ | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | | | |
| ३३ | पाटील मिलन गोविंदराव | | | |
| ३४ | फॅरो ग्रिटा स्टीफन | | | |
| ३५ | शेख आसिफ गुलाब | | | |
| ३६ | गोविंद हेलन जॉर्जी | | | |
| ३७ | डिमेलो बर्नड आल्बर्ट | | | |
| ३८ | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | | | |
| ३९ | मेन्डोंसा स्टिवन जॉन | | | |
| ४० | शर्मा भगवती तुगनचंद | | | |
| ४१ | पाटील वंदना मंगेश | | | |
| ४२ | चक्रे वंदना रामदास | | | |
| ४३ | माळी हेमा रविंद्र | | | |
| ४४ | हसनाळे ज्योत्स्ना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | | | |
| ४५ | परेरा टेरी पॉल | | | |

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ६५, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ “B” अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४९, ठराव क्र. ११९)

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११९, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मनपाकडील मंजुर अनुदान त्रैमासिक चार हप्त्यामध्ये वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**आकडे लाखात**

| **तपशिल** | **२००९-१० (सुधारीत अंदाज)** | **२०१०-११ (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| एकूण जमा | २५६७.९० | ३०५५.२० |
| “अ” अंदाजपत्रकातील हस्तांतरण | ३५०.०० | २५०.०० |
| एकूण खर्च | २९१५.८० | २८०३.१० |
| शिल्लक | २.१० | २.१० |

**एस. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौरः-**

हा ठराव मंजूर आहे

**प्रकरण क्र. ६५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ “B” अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १४९, ठराव क्र. ११९)

**ठराव क्र. ६९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. ११९, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे

मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मनपाकडील मंजुर अनुदान त्रैमासिक चार हप्त्यामध्ये वितरीत करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

**आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | २५६७.९० | ३०५५.२० |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | ३५०.०० | २५०.०० |
| एकूण खर्च | २९१५.८० | २८०३.१० |
| शिल्लक | २.१० | २.१० |

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिवः-**

प्रकरण क्र. ६६, मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५०, ठराव क्र. १२०)

**श्री. भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२०, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

**आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | १९०.०० | २०४.०० |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | १३७.०० | १४८.५० |
| एकूण खर्च | ३२६.०० | ३५१.५० |
| शिल्लक | १.०० | १.०० |

**एस. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

प्रभात पाटील

सदर ठरावामध्ये माझी सुचना आहे, वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रकात अद्ययावत मध्यवर्ती गार्डनसाठी जागा व निधीसाठी प्रोव्हीजन करण्यात यावी.

**मा. महापौरः-**

या ठरावामध्ये सुचना घेऊन हा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ६६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणाचे सन २००९-१० चे सुधारित व २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. ११/०३/२०१० नुसार शिफारस केलेले प्रकरण क्र. १५०, ठराव क्र. १२०)

**ठराव क्र. ७० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण समितीचे सन २००९-१० सुधारीत व सन २०१०-११ चे मुळ अंदाजपत्रकाबाबत कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल व स्थायी समिती ठराव क्र. १२०, दि. ११/०३/२०१० विचारात घेवून मा. सदस्यांच्या सुचनेसह व दुरुस्तीसह सन २००९-२०१० चे सुधारीत व सन २०१०-२०११ चे मुळ अंदाजपत्रकास ही मा. महासभा मंजुरी देत आहे. मुळ अंदाजपत्रकाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

**आकडे लाखात**

| तपशिल | २००९-१० (सुधारीत अंदाज) | २०१०-११ (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| एकूण जमा | १९०.०० | २०४.०० |
| "अ" अंदाजपत्रकातील हस्तांतरण | १३७.०० | १४८.५० |
| एकूण खर्च | ३२६.०० | ३५१.५० |
| शिल्लक | १.०० | १.०० |

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. एस. ए. खान**

**सदर ठरावामध्ये सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांनी खालील प्रमाणे सुचना मांडली.**

वृक्षप्राधिकरण अंदाजपत्रकात अद्यावत मध्यवर्ती गार्डनसाठी जागा व निधी यासाठी प्रोव्हीजन करण्यात यावी अशी मी सुचना मांडीत आहे.

**ठराव सुचनेसहित सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

या ठिकाणी आजची ही सभा आपण सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात आणि हे बजेट सर्वमताने पास केल्यामुळे आपले आभार मानून ही सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.३० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**